

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक

: संपादक :
**श्री.क.हि.काकरे**
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :
**डॉ.श्री.दि.परचुरे**
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

**श्री.सदानंद चेंदवणकर**
( मराठी आवृत्ती )

## श्रीसाई वाक्सुधा

वर्ष ६२ वे ) किंमत १ रुपया ( अंक १

एप्रिल १९८३
श्रीरामनवमी विशेषांक

दूरध्वनी
८८२२५६१

: कार्यालय :
" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



# श्रीसाई वाक्सुधा

अखिल विश्वा मागील संपत्ती ।
देऊनि गुरुपकार फेडूं जे इच्छिती ।
अमायिक दात्या जें मायिक अर्पिती ।
येणें का पावती उत्तीर्णता ॥ ११६ ॥

देह ओवाळू गुरुवरून ।
तरी तो केवळ नश्वर जाण ।
जीव सांडावा ओवाळून ।
तरी तो जाण मिथ्या स्वयें॥ ११७॥

सद्‌गुरु सत्यवस्तूचा दाता ।
तया मिथ्या वस्तु अर्पितां ।
उतराई काय होईल दाता ।
आहे ही वार्ता अशक्य ॥ ११८ ॥

म्हणोनि अनन्य श्रद्धापूर्ण ।
घालोनि दंडवत लोटांगण ।
मस्तकीं वंदा सद्‌गुरुचरण ।
उपकार स्मरण पूर्वक ॥ ११९ ॥

अखंड गुरुपकार स्मृति ।
हेंच भूषण शिष्याप्रती ।
त्यातूनि उत्तीर्ण होऊ जे पाहती ।
निज सुखा आंचवती ते शिष्य ॥ १२० ॥

—श्रीसाई सच्चरित् अध्याय ५१ वा.

सर्वे क्षयान्ता निचयः पतनान्ता समुच्छयाः ।
संयोगा विप्रयोगान्ता मरणान्तंच जीवितम् ॥
तस्मात्पुत्रेषु दारेषु मित्रेषुच धनेषुच ।
नातिप्रसंगः कर्तव्यो विप्रयोगो हि तैर्ध्रुवम् ॥


—वाल्मीकी नारायण ७–५२–११–१२

सर्वच संग्रह अंती नाश पावतात. उत्थानाचा अंत पतनात होतो. संयोगाचा अंत वियोगात होतो, आणि जीविताचा शेवट मरणात होतो. यास्तव पुत्र, कलत्र, मित्र व धन यांच्याविषयी अत्यधिक ममता बाळगू नये. त्यांचा वियोग हा निश्चितच आहे.

# अनुक्रमणिका एप्रिल १९८३


| | | |
|---|---|---|
| १) | संपादकीय | नवीन वर्षात पदार्पण |
| २) | उमललेली भावपुष्पे | प. पू. गोदावरी माताजी |
| ३) | रामनामस्मरण सामर्थ्य | श्री. मधुकरराव अंबाडे |
| ४) | भक्तिमार्ग एकविचार | श्री. वसंत प्रधान |
| ५) | श्रीसाई सच्चरितातील ग्रंथ | ले. कर्नल मु. ब. निंबाळकर |
| ६) | रामावतार साईबाबा।] | श्री. पां. वा. भुतकर |
| ७) | श्री उदीचा व श्रीसत्चरिताचा अनुभव | श्री. मनोहरपंत सावंत |
| ८) | अमृतकुंभ | श्री. गणपतराव म सामंत |
| ९) | भक्ति महिमा | श्री. चंद्रकांत गरगटे |
| १०) | भक्ताचा अद्‌भुत अनुभव | सौ. सुशीला चौबळ |
| ११) | श्री साईबाबांनी कोडे सोडविले | सौ. शैला म. पितळे |
| १२) | बाबांच्या जीवंतपणाचा पुरावा | श्री. के. पी. पहाडे |
| १३) | अश्रद्धा हाच मोठा अपराध | श्री. पु. कृ. धुपकर |
| १४) | लावा कावड रांगा | प्रा. र. श्री. पुजारी |
| १५) | चरणी लीन व्हावे | डॉ. ग. स. कामत |
| १६) | साईप्रार्थना | डॉ. एम. जी. दीक्षित |
| १७) | साईबाबांचं दरसन घ्यायला | [सौ. आसावरी वायकूळ |
| १८) | कृपावंत साई | सौ. मालती य. आगाशे |
| १९) | मुक्तीचा आनंद | श्री. र. श. जुन्नरकर |
| २०) | हरे क्लेश सर्व साई | श्री. प्र. अ. पुराणिक |
| २१) | श्री साईनाथाय नमः | श्री. सीताराम पवार |
| २२) | साईमहिमा | श्री. संजय परळकर |
| २३) | साईनाम | श्री. म. कृ. विचारे |
| २४) | तुझिया दारी आले साई | सौ. शोभना सोनवलकर |
| २५) | श्रीसाईनाथाष्टक | श्री. मधुकर पाठक |
| २६) | श्रीसाईलीला | श्री. पंढरीदास खर्डेकर |
| २७) | शिरडी वृत्तांत | जाने. १९८३ |

# नवीन वर्षात पदार्पण




श्रीसाईबाबांच्या श्रीसाईलीला मासिकाला आज ६१ वर्षे पूर्ण होऊन ते ६२ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. याबद्दल मनापासून आनंद होत आहे. या नूतन वर्षाचा पहिला अंक श्रीसाई भक्तांच्या हाती आज देत आहोत. हा अंक श्रीरामनवमी विशेषांक म्हणून प्रसिद्ध करीत आहोत. आमच्या दर वर्षीच्या रूढीप्रमाणेच हा अंक श्रीरामनवमी विशेषांक म्हणून प्रसिद्ध होत आहे. पण या खेपेस तो रामनवमीच्या बरेच दिवस अगोदर हं! रामनवमी हा उत्सव श्री बाबांनी स्वतः सुरू केलेला उत्सव आहे व तो श्रीबाबांच्या वेळेपासून तो आजलागायत शिरडीत अतीव उत्साहाने साजरा केला जातो. या अंकात या विशेषांकाला साजेसेच असे लेख, कविता, साहित्य भक्त वाचकांपुढे ठेवलेले आहे त्याचा ते आनंदाने स्वीकार करतील अशी खात्री वाटते.

मर्यादारूपी पुरूषोत्तम प्रभूरामचंद्राचे महत्त्व व त्याचे महात्म्य संतचूडामणी भगवान श्रीसाईबाबांनी बरोबर ओळखले होते. जनता सुखी व्हावी, भारतात व जगात सर्वत्र आबादीआबाद सुख-समाधान व प्रेमभाव वाढत रहावा हीच बाबांची मनिषा होती व त्यासाठीच तर त्यांचा हा अवतार, व आजही बाबा याच कार्यासाठी आपल्या सर्वांच्या दृष्टिआड राहून झटत आहेत.

या प्रभूरामचंद्रांवर बाबांची अपार भक्ती होती. रामायण हा तर त्यांचा आवडता ग्रंथ होता. खरोखरच रामायण हा अत्यंत उपयुक्त बहुमोली असा ग्रंथ आहे. त्यातील प्रत्येक वाक्या-वाक्यातून आपणास घेण्यासारखे कितीतरी आहे. तो फार प्राचीन ग्रंथ असला तरी तथ्य घेणाऱ्याला त्यात नवनवीन कितीतरी आहे. परंतु ग्राह्यांश आपणास घेता आला पाहिजे, व आचरणात आणता आला पाहिजे. दैनंदिन जीवनात ह्या रामायणातील तत्त्वे आपण आचरणात आणू शकले नाहीं तर रामायण वाचल्याचा व ऐकल्याचा काहींएक उपयोग होणार नाहीं. पाण्यात पडलेल्या माणसाला लाकडाचा ओंडका हाती

लागला तर तो बुडणार नाहीं. त्या लाकडावर तो लोंबकळत राहिल; परंतु किनाऱ्यावर जायचे तर त्यासाठी स्वतःचे हातपाय हालविले पाहिजेत. त्याशिवाय तरणोपाय नाहीं. त्याचप्रमाणे रामायण हा एक लाकडाचा ओंडका आहे त्याचे आपणास रसग्रहण करता आले पाहिजे. त्याचे आपणास मनन करता आले पाहिजे, व जे ग्राह्य ते जीवनात उतरविले पाहिजे. रामायणात धर्म कोणता व अधर्म कोणता याचे सुंदर विवेचन करण्यात आलेले आहे. धर्माचा उदय अंतःकरणातुन होतो व तसा तो झाला पाहिजे. धर्म रोजच्या व्यवहारात उतर-विता आला पाहिजे. धर्म हा साधुसंतांसाठीच आहे तो गृहस्थाश्रमियांसाठी नाहीं असे मुळीच समजू नका. साधु प्रमाणेच संसारी माणसानेही आपला संसारधर्म पाळावयाचा असतो. तो पालन करूनच त्याला गृहस्थाश्रम शोभविता येईल व कल्याण साधता येईल. देव वाटेल तेवढा मोठा असो व त्याचा स्वर्गलोक वाटेल तेवढ्या सुखांनी भरलेला असेना का परंतु माणसापेक्षा मोठे या जगात दुसरे काही एक नाहीं. माणूस माणूसकीने वागू लागल्यास देव त्याच्या सन्निध्य सतत रहातील. ही सुंदर विचारसरणी रामायणातून प्रकर्षाने आढळते. ही विचारसरणी प्रत्येकाने अंगीभूत आणण्याचा यत्न केला पाहिजे. म्हणून प्रत्येकाने रामायणावर प्रेम करावे. तो ग्रंथ आदराने वाचावा. खुद्द बाबांनी या ग्रंथावर प्रेम केले. रामचंद्रांबद्दल तर त्यांनी अतिशय जिव्हाळा, आदर व आत्यंतिक भावना व्यक्त केली असून या भावनेतूनच रामजन्मोत्सव साजरा करण्याची मनिषा त्यांनी व्यक्त केली. भक्तांनी त्यांची मनिषा शिरसावंद्य मानून पूर्ण केली. म्हणून शिरडीत हा बाबांचा, बाबांनी सुरु केलेला उत्सव म्हणून महा-आदराने व उत्साहाने, जल्लोषात साईभक्त साजरा करीत आलेले आहेत, असतात व यापुढेही करतील.

तेव्हां श्रीराम साईच आम्हां परब्रम्ह । श्रीराम साईच अमुचा परमार्थ परम । श्रीसाईच श्रीकृष्ण श्रीराम । निजाराम श्रीसाई ।। अशी आमची सर्वांची भावना झाली पाहिजे. हाच श्रीरामनवमी उत्सवाचा संदेश म्हणून देता येईल.

।। जय श्रीसाईराम ।।

卐

श्रीक्षेत्र शिर्डी येथे समाधिमंदिरात श्रीसाई समर्थांच्या प्रसन्न दर्शन समयी

# उमललेली भावपुष्पे

प. पू. श्री गोदावरी माता
श्री उपासनी कन्याकुमारी आश्रम, साकुरी

● सन्त सत्पुरुषांच्या सहज लीलेत सर्वांची कणव असून, त्याचा परिणाम अनंत ब्रम्हांडाचे कल्याण होण्यातच होत असतो. साई समर्थांचा अवतार दृष्टा दृष्टपूर्व अनिर्वचनीय निरूपमोत्तम आहे. श्री साईनीं दरबार खुला केला आहे. श्रीमंत, गरीब, पुण्यवान, पापी, ज्ञानी, अज्ञानी कुणीही केव्हांही यावं, अन् साई सर्वांची आई, तिच्या कुशीत शिरावं. सर्वांना सारखं मायेच पांघरूण घालील. सर्वांना सारखा खाऊ देईल. "पिताऽहमस्य जगतो माता धाता पितामहः" या भगवदुक्तिचे सगुण म्हणजे आमचे साई. त्यांच्या मुखकमलाकडे पाहिलं कीं, आपलं माहेर लाभलं असं वाटतं जणू चाऱ्ही बाजूंनी सर्वांगाला बिलगतो आहे असा, कधीहि न संपणारा आनंद निराळाच तो. साईचे औश्ठद्वय इतके बोलके आहेत कीं, त्यातून आला बोधामृत पाझरेल की काय असं वाटतं, 'अरे, या ना सर्वांनी. तुम्ही सर्व माझीच लेकरंबाळं अहांत. मी आहेना सर्वांना भक्कम आधार. मग भीति कशाची? कुणाला? कुणाची? असे एकमेव निर्भयस्थान, लौकिक भान हरपून टाकणारे म्हणजे आमचे साई. साईंच्या कृपाकटाक्षें करून शांति, स्थैर्य, सात्विक धैर्य बळावते. येणाऱ्या सर्व थरातील समस्त प्राणिमात्रांवर साईंच्या परब्रम्हरूप दृष्टितून सतत वात्सल्य प्रेम भरून वर्षाव करीत असते. जीवनात जणूं क्रांतिकारक मंगल, अनमोल सुखपर्वाची पहाट करून देत आहे, असं वाटत. साईंनी फार मोठा दिलासा दिला आहे. 'अरे, जो माझ्या मशिदीची पायरी चढेल, त्याचे सर्व पाप धुवून जाईल. ही मशीद काहीं खोटयाची नाहीं. विगतकल्पनानुभूति करून देणारे प्रयागराज तीर्थ म्हणजे साई. साईंच्या क्ष ज्ञानाग्निरूप धुनीतील भस्म सर्वांना संजीवनी मात्रे प्रमाणे तारक झाले आहे. साईचा "निष्ठा सबुरी" हा मंत्र अध्यात्म देवालयाचा पाया आहे. लौकिकातही तो उपयुक्तच आहे. सामान्य एक लिंबवृक्ष. पण साईंच्या सान्निध्याने तो कल्पद्रुम झाला आहे. त्याचा कडूरस पीयूषसम सर्वापेक्षित झाला आहे. आज त्याच्या केवल दर्शनमात्रे लाखो प्राणिमात्र पावन होत आहेत. साईंनी अन्यवृक्ष डावलून निंबातळीं निवास केला. त्यांना रुचला. धन्य ती स्थावर योनी. त्यातील जीव

"अहो भाग्यम् म होभाग्यम्" याप्रमाणे भाग्यवानच म्हटला पाहिजे.संत चरित्राचा आदर्श ठेवून प्रदीर्घ प्रयत्न करावा. हे यत्नरूप उद्यान कृपारूप फुलाफळांनी भारावेल. साईनीं अनेक प्रेमळ भक्तांसाठी स्वसंवित गुप्त रहस्य जतन केले आहे. आपलेच सत्वर जाणे होत नाहीं. गुरुमाऊली वाट बघतच असते. लहान बालकाप्रमाणे धावत जाऊन भवसमुद्र तारक नौकेप्रमाणे असलेल्या सांईच्या पाउलांना घट्ट मिठी घालावी. संपूर्ण शरणांगत व्हावे म्हणजे जीवनांचे सोने बनते. हेच सोने आपण विजयादशमीच्या निमित्ताने परमपूज्य सद्गुरु श्रीसाईसमर्थांच्या चरण-कमली समर्पण करायचे आहे. दसऱ्याच्या दिवशी अखिल विश्वाचा कारभार "श्री उपासनी महाराज" यांचेवर सोपवून ते परमधामी लीन झाले. स्थूल शरीर अंतर्धान पावले तरी साकोरीला पिंजऱ्यात "श्री उपासनी महा-राजां च्या रूपाने त्यांची निरंतर वस्ती आहेच, व आत्मरूपाने सर्व सन्निध आहेतच. अंतर्मुख वृत्तिला प्रतीत होणाऱ्या, भक्तांचे सर्वथैव मंगल करणाऱ्या सद्गुरु श्री साई समर्थांच्या पदकमली अज्ञ बालिकेचे वारंवार कोटी कोटी प्रणाम सादर व्हावेत, ही प्रार्थनारूपी आदरांजली श्री साईंना समर्पण करते.

---

## श्रीरामनवमी उत्सव शिरडी

सर्व श्रीसाईभक्तांना कळविण्यात येते की यंदा शिरडी येथे श्रीराम-नवमी महोत्सव बुधवार दिनांक २० एप्रिल ते शुक्रवार दिनांक २२ एप्रिल १९८३ पर्यंत नेहमीप्रमाणे थाटाने साजरा केला जाईल. सर्व साईभक्तांनी हेच निमंत्रण समजून महोत्सवास हजर राहून संस्थानात शांतता व सु-व्यवस्था राखण्यासाठी सर्व तो परीने सहकार्य द्यावे अशी विनंती श्री. क. हि. काकरे, कोर्ट रिसीव्हर श्रीसाईबाबा संस्थान शिरडी हे करतात. उत्सवात नेहमीप्रमाणे कीर्तने-प्रवचने होणार असून अनेक गायक-भक्त मंडळी आपापली हजेरी लावणार आहेत.

मुंबापुरीतील श्रीरामनवमी

संस्थानच्या 'साईनिकेतन' या डॉ. आंबेडकर मार्ग, दादर येथल्या कार्यालयातही गुरुवार दिनांक २१ एप्रिल रोजी श्रीरामनवमी उत्सव साजरा केला जाईल व दुपारी ठीक १२ वा. आरती व तीर्थ प्रसादाचा कार्यक्रम होईल.

# राम नामस्मरण सामर्थ्य

अनुवादक श्री. मधुकरराव अंबाडे
अंबाडे हाऊस, लकडी पुलासमोर,
दांडिया बाजार, बडोदा, ३९०००१.

(राम नामामध्ये केवढे प्रचंड सामर्थ्य आहे याची कल्पना देणारी ही एक पौराणिक बोध कथा असून ती ऽऽश्रीरामनाम महिमा अने भारतना संतरत्नो" या गुजराथी पुस्तकातून रूपांतरीत केलेली आहे. विशेष म्हणजे नारदमुनींच्या चमत्कारीक लीलेने नटलेली ही भावकथा असून ती आमच्या वाचकांना नक्कीच मोठी रंजक वाटेल. जो रामनामाचा महिमा अगदी तोच साईनामाचा महिमा हे सांगणे नकोच – का. संपादक)

● श्रीरामचंद्र, लंकेचा राजा रावण जो अधर्मी होता, त्याचा वध करून अयोध्येस आल्या नंतरच्या प्रसंगाची ही कथा आहे. मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम–चंद्रांनी आपल्या राज्यात एक भव्य संमेलन (दरबार) भरविण्याची योजना आखली. त्यांचे सद्‌गुरु पूज्य वसिष्ठ आणि अन्य मंत्री ह्यांच्या बरोबर विचार विनिमय करून भव्य दरबाराचे आयोजन करण्यात आले.

ह्या अशा भव्य दरबारासाठी, अयोध्येच्या नगर जनांनी अयोध्यानगरी सुंदर रीतीने सुशोभित करण्याचे नक्की केले. आमंत्रण पत्रिकाही तयार करण्यात आल्या. त्याप्रमाणे स्वर्गातील सर्वदेव, पृथ्वीवरील महान ऋषि–मुनी आणि तपस्वी ह्यांच्या व्यतिरिक्त सर्व राजे महाराजे ह्यांनाही आमंत्रित करण्यात आले. भव्य दरबाराला भव्य मंडप हा हवाच, म्हणून एका भव्य मंडपाचीही व्यवस्था करण्यात आली. देव लोकांसाठी सिंहासने, ऋषिसाठी योग्य आसने त्याच प्रमाणे राजांसाठीही वेगवेगल्या सुशोभित बैठकी सिद्ध करण्यात आल्या. प्रत्येक व्यक्तिच्या आसनावर नाव लिहिण्यात आले होते.

सरतेशेवटी संमेलनाचा शुभ दिवस उगवला. स्वर्गातील देवांचे प्रीय नारदमुनीही ह्या दरबारात येत होते. मार्गात अनेक राजे आणि ऋषि–मुनी त्यांना भेटले. प्रत्येक राजा श्रीरामचंद्रांचे आमंत्रण आहे अशी चर्चा करीत होता. नारदमुनींनी मनातल्या मनात विचार केला की, ह्या सर्वांना मर्यादा

पुरुषोत्तम श्रीरामनामाचा महिमा समजवावा म्हणून त्यांनी त्यांच्या स्वभावा-नुसार योजना नक्की केली.

श्रीरामाचा भव्य दरबार मंडपाच्या भव्य प्रवेश द्वारावर श्रीरामचंद्र आपल्या बधुंसह आणि प्रधानांसह आमंत्रित पाहुण्यांचे नम्रतापूर्वक स्वागत करीत होते. अनुचर मंडपाच्या आयोजनानुसार दरेकास आपआपल्या स्थानी घेऊन जात होते. भव्य मंडप पाहून सर्व देव आणि ऋषिमुनी आनंदाचा अनुभव घेत होते. राजे महाराजे तर अत्यंत प्रसन्नतेने श्रीरामाचेच गुणगान गात होते.

श्रीरामचंद्रांच्या दरबारात अन्य देवांसह नारदमुनी येत होते, त्याचवेळेस भारतातील एक स्वास्थिक नावाचा समर्थ राजासुद्धा येत होता. नारदमुनींनी त्यांना बोलाविले. स्वास्थिक राजाने आभार मानून त्यांना प्रणाम केला. त्या-वेळेस नारदमुनींनी त्यांना एक विचित्र सूचना केली. नारदमुनी स्वास्थिक राजाला म्हणाले, ऽऽहे राजा! पहा, त्या मंडपात आपल्या उजव्या बाजूच्या रांगेत महान ऋषि, मुनी, महात्मा बसलेले आहेत, त्या प्रत्येकाला प्रणाम कर. परंतु राज सिंहासनाच्या शेजारी आसनस्थ झालेल्या पू. श्री. विश्वामित्रांना मात्र प्रणाम करू नकोस."

अशा प्रकारची ही विचित्र सूचना ऐकून राजा फार विचारात पडला. परंतु नारदमुनींच्या सूचनेचा अनादर करणंही शक्य नव्हत. राजाने क्रमाप्रमाणे एका नंतर एक अशा रीतीने प्रत्येक ऋषींना प्रणाम केला. परंतु श्री विश्वामित्र ऋषींना प्रणाम न करताच तो स्वतःच्या स्थानी जाऊन बसला. ह्या नंतर सभेमध्ये पू. श्री. रामचंद्राचे आगमन झाले, आणि सभेचे संचालन करण्यासाठी त्यांनी पू. श्री वशिष्ठांना विनंती केली. त्याच वेळेस श्री विश्वामित्र रामाला म्हणाले, "ह्या स्वास्थिक राजाने माझा अपमान केला आहे, त्याचा निर्णय प्रथम घ्यायला हवा. श्री रामचंद्र म्हणाले 'महाराज! आपणासारख्या समर्थांचा अपमान कोण करू शकणार आहे? काय झालं ते कृपया सांगाल कां?

श्री विश्वामित्र म्हणाले की, "ह्या स्वास्थिक राजाने अन्य सर्व उपस्थित जनांना वंदन केलं आहे. मात्र माझा अपमान करण्यासाठीच मला वंदन केलं नाही. म्हणून त्यांना मृत्युदंड झाला पाहिजे." सभेच्या सुरुवातीलाच झालेल्या विवादामुळेच श्री रामचंद्रांवर हे धर्मसंकट कोसळेल. श्री विश्वामित्रांना समजा-

वर्णीच्या स्वरात राम म्हणाले की, "आत्ताचा हा प्रसंग संपल्यानंतर, चार दिवसांनी मी अपमान करणाऱ्याला मृत्युदंडाची शिक्षा करीन." श्री विश्वामित्र म्हणाले, 'प्रिय व्यक्तिची शपथ घेऊन प्रतिज्ञा करा तरच ही गोष्ट आत्तासाठी सोडून देऊ.' श्रीरामाने विचार केला की, मला सर्वांत प्रिय व्यक्ति कोण? देवाला सर्वांत प्रिय असेल तर आपला भक्तच. ह्या न्यायानुसार ते म्हणाले "मी मारुतीची शपथ घेऊन सांगतो की, "चवथ्या दिवशी स्वास्थिकराजाला मृत्युदंड करीन." विश्वामित्र संतुष्ट झाले.

परंतु श्री स्वास्थिक राजाने ही गोष्ट ऐकली आणि तो अत्यंत भयभीत झाला. ताबडतोब जेथे नारदमुनी बसले होते तेथे राजा गेला. त्यांना सर्व हकीगत सांगितली आणि म्हणाला, "काही एक कारण नसताना माझ्यासारख्या निर्दोषी माणसाचा बळी घेण्याचं का बरं ठरवलं आहे? राम एकवचनी आहे. म्हणून माझा मृत्यु निश्चित आहे.' नारदमुनी म्हणाले, "हे राजा! तुझ्या केसालाही धक्का लागणार नाहीं. घाबरू नकोस. परंतु तू हनुमंताला शरण जा.' स्वास्थिक राजा म्हणाला; "मी हनुमंताला जाऊन काय सांगू?" नारदमुनी म्हणाले, 'तू फक्त चौथ्या दिवसासाठी अभय माग" स्वास्थिक राजा संध्याकाळी हनुमंता-कडे गेला आणि प्रणाम करून म्हणाला "आपण रामाचे समर्थ भक्त आणि सेवक आहात. मी आपल्याला शरण आलो आहे. चवथ्या दिवशी माझा मृत्यु आहे. कृपा करून माझं रक्षण करा."

हनुमान म्हणाला "आपल्यासारख्या एका समर्थ राजाने मला शरण यावं ही आश्चर्याची गोष्ट आहे. तरीसुद्धा शरण आलेल्याला रक्षण देणं हा धर्म आहे. मी तुमचं चवथ्या दिवशी जरूर रक्षण करीन" स्वास्थिक राजा म्हणाला, "आपण सांगता ते मला मान्य आहे. परंतू एका महान व समर्थ राजाने मला मारण्याची प्रतिज्ञा केली आहे. म्हणून आपण आपणास सर्वांत प्रिय अशा व्यक्तिची शपथ घेऊन मला वचन द्या." हे ऐकून मारुती म्हणाला, 'मी रामाची शपथ घेऊन सांगतो की, मी तुमचं रक्षण करीन."

श्री नारदमुनींच्या लीलेने तर कमालच केली. रामाने हनुमानाची शपथ घेऊन स्वास्थिकला मारण्याची प्रतिज्ञा केली आणि हनुमानाने रामाची शपथ घेऊन स्वास्थिकला रक्षण देण्याची प्रतिज्ञा केली. भक्त आणि ईश्वर धर्मसंकटात सापडले.

इकडे रामाच्या दरबाराचा आरंभ झाला. जनकल्याणासाठी प्रत्येकाला विषय देण्यात आले होते. त्या प्रमाणे काहीं ऋषिंनी वेदाचे महत्त्व सांगितले. कोणी ज्ञान, कोणी भक्ति, तर कोणी वैराग्यावर भर दिला. जनकल्याणाच्या निरनिराळ्या विषयांचे मार्गदर्शन केले, आणि तीन दिवसांनंतर सभा पूर्ण झाली. प्रत्येक पाहुण्याला रामाने दोन दिवस जास्त राहाण्याचा आग्रह केला सर्वजण संमतही झाले. स्वर्गातील गांधर्वांच्या गाण्याचा कार्यक्रम झाला आणि अप्सरांच्या नृत्याचा कार्यक्रम झाला.

आता चौथा दिवस उगवला. रामाला आपल्या प्रतिज्ञेची आठवण झाली. त्यांनी समर्थ राजा स्वास्थिकला बोलावणं पाठविलं. स्वतःच्या प्रतिज्ञेचे कारण सांगितले आणि युद्धाचा आदेश दिला. स्वास्थिक राजा हनुमानाकडे गेला आणि त्याने सर्व वस्तुस्थिती त्याला स्पष्ट शब्दात सांगितली. हनुमान तर मोठ्या विचारात पडला. परंतु स्वतः रामाची शपथ घेतली असल्याकारणाने प्रतिज्ञा भंग न व्हावा त्यासाठी स्वास्थिकला स्वतःच्या खांद्यावर बसवून युद्धभूमिवर गेला

दरबारातील सर्व आमंत्रित देव, ऋषिमुनी आणि राजे हा अलभ्य प्रसंग पहाण्यासाठी रणांगणावर आले होते. युद्धभूमिवर स्वास्थिक राजाला हनुमानाच्या खांद्यावर बसलेला पाहून रामाला आश्चर्य वाटलं परंतु राम एकवचनी असल्या मुळे आपल्या धनुष्याला बाण लावला. स्वास्थिक राजा अत्यंत भयभीत झाला.

हनुमान म्हणतो, "तुमचं धनुष्य फेकून द्या आणि घाबरण्याची काहीच आवश्यकता नाहीं. खालीलप्रमाणे चार अक्षरी मंत्र म्हणा."

**"सीताराम, सीताराम, जय सीताराम"**

रामाचा बाण सण्ण् ...... करत गेला. परंतू हनुमानाला प्रणाम करून परत भात्यात बसला. रामाला फार आश्चर्य वाटलं. त्यांनी दुसरा बाण धनुष्या वर चढविला. तो बाण स्वस्थिक राजाकडे गेला. हनुमानाने ह्या वेळेस खालील प्रमाणे तेरा अक्षरी मंत्राचा जप करण्यास सांगितलं :—

**"श्रीराम जय राम जय जय राम"**

रामाच्या आश्चर्यासह बाण अर्ध्यातूनच परत फिरला. राम विचार करू लागले की, पहिल्या बाणाची शक्ति त्राटिका वधामुळे क्षीण झाली असेल. आणि

दुसऱ्या बाणाची शक्ति वाली वधामुळे कदाचित कमी झाली असेल. नंतर त्यांनी तिसरा बाण काढला आणि सोडला.

स्वास्थिक राजा घाबरला. हनुमानाने सांगितलं, ह्या वेळेस खालील प्रमाणे सोळा अक्षरी मंत्र बोला.

ऽऽहरे राम, हरे राम, राम राम हरे हरे"

तिसरा बाण सुद्धा ह्या मंत्र शक्तिने परत फिरला. रामाने विचार केला कुंभकर्णाच्या वधामुळे त्याची शक्ति कमी झाली असेल. म्हणून चवथा बाण पूर्ण निश्चयाने सोडण्याचा विचार केला, आणि आता बाण मारणार तोच ह्या वेळेस हनुमानाने एकवीस अक्षरी मंत्र जपण्यास सांगितला.

ऽऽरघुपति राघव राजाराम, पतित पावन सीताराम"

ह्या मंत्राच्या प्रतापाने रामचंद्राच्या हातातील बाण पुढे गेलाच नाहीं, आणि पतित पावन मर्यादा पुरुषोत्तम राम विचारात पडले.

तेवढ्यात नारद तेथे हजर झाले. त्यांनी स्वास्थिक राजाला, हे दिव्य युद्ध पहात बसलेल्या विश्वामित्रांनी शरण जाण्यास सांगितले. ताबडतोब राजा पळत पळत जाऊन विश्वामित्रांच्या चरणी पडला. विश्वामित्रांचं समाधान झाल्यामुळे त्यांनी रामाला हे युद्ध थांबविण्याची विनंती केली. आणि मृत्युदंड माफ करण्यास सांगितलं. रामाने त्यांचा शब्द मानला. दरबारात आलेले आणि हे युद्ध पहात असलेले सर्व देव आणि राजे यांनी नारदमुनींना पाहून त्यांचीच ही लीला असणार अशा खात्रीने त्यांना विचारले, "अशा शुभ प्रसंगी आपण अशी गडबड कशासाठी केली? भक्त आणि देव ह्यांना समोरासमोर युद्धात का बरं आणलं?"

नारदमुनी म्हणाले, 'तुम्हांला हे युद्ध थांबलं आहे असं वाटत आहे. परंतु तुम्ही ह्यांच रहस्य जाणाल तेव्हां तुम्हांलासुद्धा हेतु समजेल. त्यानंतर त्यांनी हनुमानाला बोलावलं, आणि सर्वासमक्ष विचारलं, "तुम्ही रामाचे बाण परत कसे काय पाठविले?

हनुमानाने सांगितलं, "मी बाण परत पाठविलेजे नाहीत. परंतु "रामनाम" ऐकून बाणच परत गेले." हा खुलासा ऐकून सर्व देव आणि मानव आश्चर्य–चकित झाले.

नारदमुनींनी सांगितलं, 'हे देवानों! आणि मानवानों! मला-तुम्हांला हेच दाखवून द्यायचं आहे की, रामापेक्षाही 'रामनामात' जास्त सामर्थ्य आहे. रामाला लंकेला जाण्यासाठी पूल बांधावा लागला होता. परंतु हनुमान तर रामाचे 'नाव' घेऊनच पुला शिवाय समुद्र पार करून लंकेला पोहोचला होता.

नारदमुनींनी अशा रीतीने "नामस्मरणाचे" महात्म्य काय आहे तें दाखवलं. रामसुद्धा फार प्रसन्न झाले. प्रत्येक देवाने आणि मानवाने रामाला वंदन करून रामाचेच नामस्मरण करत रामाचा निरोप घेतला.

श्रीराम एवं परं बल, राम एवं परम तप
राम एवं परं तत्त्वम्, श्रीरामो ब्रम्हतारकम
॥ओम् साईराम ॥

☆

# भक्तिमार्ग–एक विचार

**श्री. वसंत वामन प्रधान**
श्री गणाधिराज को. ऑ. हाऊसिंग
सोसायटी, बि. नं. २, ब्लॉक नं. ९२,
मिठागर रोड, मुलुंड (पूर्व) मुंबई ४०० ०८१

● भारतीय स्त्री जीवनात पतिव्रताधर्माला अनन्य साधारण महत्त्व आहे. रजपूत रमणींची व महाराष्ट्रीय स्त्रीयाची प्रामुख्याने व इतर प्रांतीयांचीसुद्धा सती जाण्याची प्रथा यात केवळ स्वखुशीचाच विचार ग्राहय धरला आहे. सतीची प्रथा कायद्याने बंद केली व ती रूढी कालबाहय ठरली. प्रस्तूत लेखांत एका विविक्षित दृष्टिकोनातून भक्ति मार्गाच्या संदर्भात पतिव्रता धर्माचा विचार केला आहे. स्त्रीला आपल्या जीवनात पति हे तिचे सर्वस्व होय हे आजही सुधारणा युगात सर्वमान्य आहे. इतकेच नव्हे तर तो भारतीय स्त्रीचा आदर्श आहे. पतीला स्त्री आपल्या जीवनाचे कायीक वाचीक मानसिक सर्वस्व अर्पण करते त्याप्रमाणे भक्तिमार्गात आपण परमेश्वराला सर्वस्व अर्पण करावे. पतीव्रता धर्मात स्त्री पतीच्या ठिकाणी अव्याभिचारी प्रेम करते, संत मीराबाई कृष्ण भक्तिचा उत्कृष्ट आदर्श आहे. महा सती अनुसयाने आपल्या पतीचे चरणतीर्थ घेवून ब्रम्हा विष्णू महेश यांना बाल स्वरूप दिले. व रज, तम, सत्व यांचे

एकत्रिकरण करून त्रिगुणात्मक भगवान श्री दत्तात्रेय अवतार रूपाने प्रगट झाले. केवढे सामर्थ्य महासती पतीव्रता अनुसयेचे की भगवान दत्तात्रेय सद्‌गुरुच्या भूमिकेत उपासकांचा उद्धार करीत आहेत. अक्कलकोट 'स्वामी समर्थ' व नंतर शिरडीचे श्री साईबाबा भगवान दत्तात्रेयाचेच अवतार मानले जातात. भक्ति मार्गात मातृप्रेमाचे स्थान फारच वरच्या दर्जाचे आहे. मातृदेवोभव, पितृदेवोभव, आचार्यदेवोभव, अशा क्रमांकाने मातेचे स्थान आहे. भगवान श्री रामकृष्ण परमहंस व त्यांचे शिष्य परम स्वदेशप्रेमी स्वामी विवेकानंद यांनी माता म्हणूनच उपासना केली व सर्वांनी परमेश्वराची भक्ति मातेच्याच स्वरूपात करावी असे त्यांनी प्रतिपादन केले. भगवान रामकृष्ण सिद्धपुरुष होते त्यांनी अखिल स्त्रीजात स्वपत्निसह माताच मानली सारे मृदुभाव स्त्रीच्या ठिकाणी असतात स्त्री म्हणजे मूर्तिमंत त्यागमय जीवन. साने गुरुजींचे मातृप्रेम सर्वश्रुत आहेच. आपण संसारी माणसे सांसारिक जीवन जगत असता गृहस्थ धर्माचे पालन (श्री संत–श्रेष्ठ एकनाथ महाराजांचा आदर्श समोर ठेवून) करून जेवढे त्यागमय जीवन जगता येणे शक्य असेल तेवढे जीवनांत अंतर्भूत करून विश्वाची जननी श्री साई माऊलीची अत्यंत प्रेमाने भक्ति करावी. आत्यंतिक प्रेमाची परिणती भक्तित होते, व अशा भक्तित आपल्या जीवनाचे स्थान दुय्यम रहाते, व पक्व भक्तिच्या अवस्थेत जीवनाची विस्मृति जाणवू लागते. श्रीसाई स–आई आईसह आई अधिक काहींतरी श्री साई सद्‌गुरु माऊली. आईच्या प्रेमाच्या संदर्भात राजकवी यशवंताच्या चार ओळी नमूद करतो. :– चारा मुखी पिलांच्या चिमणी हळूच देई, गोठ्यात वासरांना त्या पाजतात गाई, स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी या काव्यात मातेची वत्सलता हृदयाला स्पर्श करते. त्याचप्रमाणे हेमाडपंत श्री साई सच्चरित अध्याय ३८ मध्ये लिहितात:– तान्हें बाळ खाऊ जाणे ॥ काय खाऊ ते ते नेणे ॥ दूध वाकबळ लावूनी भरवणे। काळजी ही घेणे मातेने ॥१०॥श्री साई सच्चरित अध्याय ४० निज तान्हि या कनवाळू माई ॥ तैसा निजभक्तां प्रत्यक्ष साई ॥ असो कुठेही धावत येई॥ कणव त्या होईल उतराई ॥२०॥ श्री सद्‌गुरु साईमाता याच्याही पुढे जन्म जन्मांतरीचे दुःख हरण करते. आईचे प्रेम तर साईमाता देतेच पण सद्‌गुरुच्या अधिक भूमिकेतून आपली जपणूक करते व जन्म मरणाच्या दुःखातून मुक्त करते. अशी ही श्रीसाई माऊली प्रेमाची निर्झरिणी, जगातील साऱ्या कारुण्याचे एकवटलेले प्रतीक आहे. मातेच्या मांगल्याची वत्सलता असणारी जगज्जननी, आमचे सारे दोष आमचे सारे अपराध पोटात घालणारी व नकळत सन्मार्गावर आणणारी सत्‌संगाची जोड देणारी, अशी ही सत्यम शिवम सुंदरम् मूर्ती आपण

# श्रीसाईसच्चरितात उल्लेखिलेल्यात ग्रंथांची माहिती

ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)
१–१४ फाईव्ह स्टार अपार्टमेंट्स
बंड गार्डन रोड, पुणे–४११००१

## (१) एकनाथी भागवत

(अ. १८।७६, अ. २२।१८३, अ. २७।४७, अ. ४५।४४, अ. ५२।४६)

हा ग्रंथ म्हणज पैठणच्या सुप्रसिद्ध संत एकनाथ महाराजांनी श्रीमद्‌भागवत महापुराणातील ११ व्या स्कंधाची मराठी भाषेत केलेली ओवीबद्ध टीका होय. श्री ज्ञानेश्वरांच्या श्रीमद्‌भगवतगीतेच्या टीकेप्रमाणे ही देखील नुसती टीकाच नसून एक स्वतंत्र ग्रंथच झालेला आहे. श्री तुकाराम महाराजांनी या ग्रंथाची भंडारा डोंगरावर एक हजार पारायणे केली होती यावरूनच याचे महत्त्व कळेल. श्री साईसच्चरितात या ग्रंथाचा वारंवार उल्लेख आला आहे. एवढेच नव्हे तर श्रीसाईसच्चरितातील ओव्या देखील एकनाथ महाराजांच्या धाटणीच्या आहेत. हा ग्रंथ एकनाथ महाराजांनी शके १४९५ साली म्हणजे सुमारे ४०० वर्षापूर्वी लिहिला.

या ग्रंथाचे ३१ अध्याय आहेत. स्वतः एकनाथ महाराजांनीच तसे म्हटले आहे.

"हा एकादश नव्हे जाण । एकतिसां खणांचे वृंदावन ।
एथ नित्य वसे श्रीकृष्ण । स्वानंदपूर्ण निजसत्ता ॥ अ. ३१ । ओ. ४६६ ॥

तरीपण श्रीसाईसच्चरितातील अ. १८ ओ. ८५ व अ. ५२ ओ. ४६ मध्ये या ग्रंथाचे वर्णन "बत्तीसखणी वृंदावन" म्हणजे ३२ अध्याय असलेले असे कां केले आहे हे समजत नाहीं. हेमाडपंतांकडून अशी चूक होणे शक्य वाटत नाहीं. कदाचित ही मुद्रणाची चूक असेल. परंतु आश्चर्य असे की अगदी प्रथम आवृत्ती पासून (श्रीसाईलीलेच्या अंकापासून) ते आजपावेतो "बत्तीसखणी" असेच छापलेले आढळते असो.

श्रीसाईबाबांना हा ग्रंथ फार आवडत असे. ते त्याला "वृंदावनाची पोथी" म्हणत असत. आणि कै. काकासाहेब दीक्षितांकडून वाड्यात भक्तांकरिता नेहमी नेहमी वाचवून घेत असत. बाबांना एकनाथ महाराजांनी या ग्रंथाला "वृंदावन" म्हटलेले तो ग्रंथ न वाचता कसे ठाऊक होते याचे त्याकाळी भक्तांना एक मोठे आश्चर्यच वाटत होते. हेमाडपंतांनी तर या ग्रंथाचा महिमा श्रीमद्‌भगवतगीते–पेक्षाही जास्त गाईला आहे

**ऽभारती संवाद कृष्णार्जुनांचा । त्याहून सरस हा कृष्णोद्धवांचा ।।'**

(अ. १८ ओ. ९३)

**(२) भावार्थ रामायण** (अ. २२ ओ. १८३)

हा ग्रंथही एकनाथ महाराजांनी लिहिलेला असून तितकाच प्रासादिक व भक्तिपूर्ण आहे. म्हणूनच काय ही रामकथासुद्धा कै. काकासाहेब दीक्षितांकडून भक्तांकरिता बाबा नित्य वाचून घेत. हा ग्रंथ एकनाथ महाराजांनी शके १५२१ साली म्हणजे एकनाथी भागवतानंतर २६ वर्षांनी लिहिला. याबद्दल एक कथा सांगतात की एकनाथ महाराजांनी हा ग्रंथ युद्धकांडातील ४४ अध्यायापर्यंत लिहीला व देहत्याग केला. परंतु त्यापुर्वी त्यांनी आपल्या एका गायबा नावाच्या अगदी वेडसर आणि अशिक्षित शिष्याच्या मस्तकावर हात ठेवून राहिलेला ग्रंथ लिहून पूर्ण करण्याची त्याला आज्ञा केली. गायबाने युद्धकांडाचे राहिलेले अध्याय (४५ ते ९२) व संपूर्ण उत्तरकांड (१ ते ७७ अध्याय) तर लिहून पूर्ण तर केलेच परंतु त्याने रचलेल्या ओव्या देखिल नाथांच्या ओव्या इतक्याच काव्यमय व सुंदर असून वेगळ्या वाटतच नाहीत. अशा प्रकारे एकनाथ महाराजांनी आपल्या वाङ्‌मयात सद्‌गुरुभक्तिची जी वारंवार महिमा गाईली आहे त्याची साक्षात् प्रचिती या ग्रंथाच्या शेवटच्या रूपाने त्यांनी दाखवून दिली. गायबाने स्वतःच म्हटले आहे :—

**सद्‌गुरुची कृपा घडे । तै पांगुळा पर्वत चढे ।**
**एकनाथे तेणे पाडें । केलें रोकडें मज सरते ।।** युद्धकांड अ. ९२ श्लो. ७१।।

**(३) ज्ञानेश्वरी उर्फ भावार्थदीपिका**

(अ. ४१।७८, अ. १९।२२२)

हा ग्रंथ महाराष्ट्रात अत्यंत प्रसिद्धच आहे. श्रेष्ठ संत ज्ञानदेवांनी गोदावरी पासून दोन कोसावर प्रवरेच्या काठी असलेल्या म्हाळसापूर अथवा नेवासे मुक्कामी शके १२१२ म्हणजे सुमारे ७०० वर्षांपूर्वी व वयाच्या अवघ्या १९ व्या वर्षी श्रीमद्‌भगवद्‌गीता हा अलौकिक टीका ग्रंथ पूर्ण केला. हा ग्रंथ म्हणजे गीतेचे नुसते मराठी ओव्यात भाषांतरच नव्हे तर एक स्वतंत्र प्रासादिक व काव्यमय ग्रंथ आहे. गीतेचे संस्कृत श्लोक ७०० च आहेत तर श्री ज्ञानेश्वरांनी त्यावर लिहिलेल्या ओव्यांची संख्या ९००० चे वर आहे.

**(४) श्रीमद्‌भगवतगीता**
(अ. ३९ व अ. ५०)

या प्रसिद्ध संस्कृत ग्रंथाबद्दल तर कुणा भारतीयाला तर सांगावयालाच नको. महर्षि व्यासांनी लिहिलेल्या महाभारतात भीष्मपर्वामध्ये अध्याय १३ ते ४२ मध्ये श्रीकृष्ण भगवानांनी कुरुक्षेत्र येथे कौरवपांडव युद्ध सुरू होण्यापूर्वी अर्जुनाला ही गीता सांगितली याचे १८ अध्याय व ७०० श्लोक आहेत. या ग्रंथातील उपदेश साक्षात् भगवान श्रीकृष्णांच्या तोंडातून निघालेला असल्याने त्याचे महत्त्व भारतीयांना इतर शास्त्रापेक्षाही जास्त वाटते.

**(५) श्रीमदभगवत महापुराण**
(अ. ४३ ओ. ४२)

हे प्रसिद्ध संस्कृत पुराणदेखील महर्षि व्यासांनी लिहिलेले आहे, व भक्ति–रसाने (खास करून श्रीकृष्ण भगवानांच्या) ओथंबलेले आहे. याचे १२ स्कंध आहेत. या ग्रंथाचा सप्ताह (सात दिवसात पारायण) नेहमी केले जाते. देहाव–सान निकट आले असतांना राजा परिक्षीताने व्यासपुत्र शुकदेवाकडून हे सात दिवस ऐकले होते व त्यामुळे त्याला सुखाने देहान्त लाभला होता.

**(६) श्रीगुरुचरित्र**
(अ. १८ ओ. ४३, अ. १९ ओ. २२४)

हा फार जुना, गोड, रसाळ व प्रासादिक ग्रंथ म्हणजे श्रीसरस्वती गंगाधर यांनी क्षेत्र औदुंबर, श्रीवाडी, श्रीगाणगापूर निवासी। श्री समर्थ सद्‌गुरु नृसिंह–

सरस्वती महाराज यांचे लिहिलेले चरित्र होय. हा ग्रंथ महाराष्ट्रात पूर्वीपासून फार प्रसिद्ध आहे. आणि अजूनही याचे हजारो ठिकाणी नियमाने रोज अध्ययन पठण होते. व प्रसंगानुसार पारायणे व सप्ताहही होतात. खुद्द कै. दाभोलकर (हेमाडपंत) यांचा ४० वर्षांच्यावर या ग्रंथाचा पाठ होता. या गुरुचरित्राचे ५२ अध्याय आहेत व कै. दाभोलकरांचा (हेमाडपंतांचा) ही आपले श्रीसाई–सच्चरित अवतरणिकेसह ५२ अध्यायात पूर्ण करावयाचा बेत होता. परंतु त्यांचा अचानक देहान्त झाल्याने व अवतरणिकेच्या ओव्या न सापडल्यामुळे कै. बा. वि. देव (बाबांचे बाळ) यांना कै. दाभोलकरांचे चिरंजीव श्री. गजानन राव यांच्या सहाय्याने ५३ वा अध्याय लिहून ते चरित्र पूर्ण करावे लागले.

**(७) श्रीविष्णुसहस्त्रनाम स्तोत्र**
(अ. २७ ओ. ७३, अ. १९ ओ. २२३)

हे संस्कृत भाषेतील स्तोत्र भीष्मपितामहांनी युधिष्ठिराला सांगितले होते. व महाभारतात अनुशासन पर्वात आलेले आहे. हे बरेचसे मोठे म्हणजे १४२ श्लोकांचे आहे. त्यात श्रीविष्णूच्या एक हजार नावाचे श्लोक मात्र १०७ असून बाकीच्या श्लोकात प्रास्ताविक व फलश्रुति सांगितली आहे. हे स्तोत्र मोठे असले तरी म्हणायला सोपे व लयबद्ध आहे. शिरडी येथे श्रीसाईबाबांच्या मंगलस्नानाचेवेळी हे म्हटले जाते. या स्तोत्राचे फल अत्यंत श्रेष्ठ आहे. म्हणूनच की काय श्रीसाईबाबांनी एका रामदास्याची विष्णुसहस्त्रनामाची पोथी घेऊन ती बळेच शामाला, आपल्या लाडक्या भक्ताला दिली व त्याला पाठ करण्यास सांगितली. कै. दाभोलकर, कै. दासगणू महाराज व स्वर्गीय श्री राधाकृष्ण स्वामी यांचा हे स्तोत्र रोज म्हणण्याचा नियम होता.

**(८) श्रीरामरक्षा स्तोत्र**
(अ. १८ ओ. १३)

हे संस्कृत भाषेतील स्तोत्र बुधकौशिक ऋषिंनी रचिलेले असून याचे फक्त ३८ मंत्रमय श्लोक आहेत हे सर्व संरक्षक असल्याने फार प्रचलित आहेत. हेमाडपंतानी अठराव्या अध्यायात या स्तोत्राचा उल्लेख स्वतःवर बाबांनी राधा–बाईच्या गोष्टीरूपाने केलेल्या अनुग्रहाचे वर्णन करताना केलेला आहे. त्याकाळी प्रचलित मत होते की गुरुने सांगितलेला उपदेश इतरांना सांगू नये व सांगितला तर तो विफल होतो. त्यावर हेमाडपंतांनी बुधकौशिक ऋषिचे उदाहरण घेतले.

या ऋषिंना साक्षात् शंकरांनी स्वप्नांत येऊन आपले गुह्यतम असे रामनाम वैभव सप्रयोग सांगितले होते. पुढे स्वतःच्या देहावसाना बरोबर हे गुह्यतम ज्ञान संपुष्टात येऊ नये म्हणून व अज्ञानी दुःखिजनांना भविष्यकालात ते उपयोगी पडावे म्हणून त्यांनी ते सर्व ज्ञान अक्षरांकित केले व या स्तोत्राच्या रूपानें जगापुढे ठेवले हे उदाहरण घेऊनच हेमाडपंतांनी खालील ओवी लिहिली

**गुरु वर्षाकाळीचे घन । आवडी वर्षती स्वानंद जीवन ।**
**ते काय ठेवावे कोंडून । यथेच्छ सेवून सेववावे** ॥ अ. १८ ओ. १४ ॥

आणि अध्याय १८ व १९ मध्ये बाबांनी केलेला अतिउत्तम व मौल्यवान उपदेश ग्रंथित करून आम्हांवर अनंत उपकार करून ठेवले.

(९) **पंचरत्नगीता**
(अ. २७ ओ. १२१)

हा छोटासा ग्रंथ म्हणजे ज्यात महाभारतातील खालील पांच रत्ने आहेत तो :—

(अ) श्रीमद्‌भगवतगीता (भीष्म पर्व अ. १३ ते ४२)
वर क्रमांक ४ पहा
(ब) श्रीविष्णुसहस्त्रनाम (अनुशासन पर्व अ. १४९)
वर क्रमांक ७ पहा
(क) भीष्मस्तवराजः (शान्तिपर्व अ. ४७)
भीष्माने केलेली श्रीकृष्णाची स्तुती
(ड) अनुस्मृतिः (शांतिपर्व अ. २०९ श्लोक ३६ नंतर)
ॐ नमो भगवते वासुदेवाय या मंत्राच्या जपाचे महत्व व नारद देवर्षिनीं केलेली विष्णु भगवान्‌ची स्तुति
(इ) गजेन्द्रमोक्ष (शांतिपर्व)
एका गजेन्द्राला (मोठ्या हत्तीला) सरोवरातील एका ग्राहने (मगराने) पकडले असता त्याने श्रीविष्णुभगवानांना कमलपुष्प अर्पण करून त्यांची केलेली स्तुती व त्यावरून श्री विष्णुभगवानांनी गरुडावर धावत येऊन केलेली त्यांची सुटका याचे वर्णन.

अध्याय २७ मध्ये रामदास्याने हीच पोथी शामाकडून विष्णुसहस्त्रनामाच्या पोथीच्या बदली मागितली होती. म्हणजे या मागणीत त्याने विष्णुसहस्त्रनाम तर मिळविलेच परंतु आणखी चार उत्तम ग्रंथ स्तोत्रे मिळविलीत.

### (१०) गीतारहस्य
(अ. २७, ओ. १३३, अ. १९, ओ. २२४)

हा ग्रंथ म्हणजे कै. लोकमान्य टिळकांनी लिहिलेली गीतेवरची टीका होय. ज्ञानेश्वरीच्या खालोखाल गीतेवरची मराठी भाषेतील हीच अत्यंत महत्त्वाची व प्रसिद्ध टीका आहे. यात लोकमान्यांनी कर्मयोगावर जास्त महत्त्व दिले आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे श्रीकृष्ण भगवान वारंवार अर्जुनाला ऽउत्तिष्ठ' ऽयुद्धस्व' असे म्हणत होते त्याअर्थी लोकमान्यांचे म्हणणे की संसारात मनुष्याने आपल्या जन्माने व परिस्थितीमुळे लाभलेले कर्तव्य निष्काम बुद्धिने करीत गेले पाहिजे. गीतेत भक्तियोग व ज्ञान (संन्यास) योग सांगितला तो योगायोगाने परमार्थाचा दुसरा मार्ग म्हणून. एकूण लोकमान्यांच्या मते गीतेत ऐहिक व पारमार्थिक या दोन्ही अभ्युदयाचा मार्ग विस्तृतपणे सांगितलेला आहे. असो.

श्रीसाईबाबांनाही हा ग्रंथ महत्वाचा वाटत होता म्हणूनच त्यांनी या ग्रंथावर एक रुपया ठेवून कै. बापूसाहेब जोगांच्या पदरात टाकून –

**ऽऽम्हणाले हा वाचा साद्यंत । कल्याणप्रद होईल ॥** अ. २७ ओ. १३७ ॥

लोकमान्य टिळकांनी कै. दादासाहेब खापर्ड्यांच्या मार्फत बाबांची ता. १९ मे १९१७ रोजी प्रत्यक्ष भेट घेतली होती. त्यावेळी लोकमान्यांनी आपल्या देशाच्या स्वराज्याच्या कार्याबद्दल बाबांचा सल्ला विचारला होता. आणि अन्तर्ज्ञानी बाबांनी त्यांना सांगितले होते ऽऽतुमचे आता वय झाले आहे व तुम्हांला विश्रांतीची जरूर आहे. तेव्हा तुम्ही आराम करा." पुढे खरोखरीच लोकमान्यांचे लवकरच म्हणजे ३१ जुलै १९२० मध्ये निधन झाले. आणि त्यांचे स्वराज्याचे कार्य अपुरे राहिले पुढे महात्मा गांधींनी पुढे येऊन ते साकारास आणले हे सर्वांना माहितच आहे.

**(११) अध्यात्म राम ायण**
(अ. २७।६६, अ. १९।२२२)

हा ग्रंथ संस्कृत भाषेत असून याला वाल्मिकी रामायणाची संक्षिप्त व पारायणास सुलभ आवृत्ति म्हणता येईल. वाल्मिकी रामायणाचे २४००० श्लोक व ५०० सर्ग आहेत तर याचे ४३०० श्लोक व ६५ सर्ग आहेत. काण्डे मात्र वाल्मिकी रामायणा इतकीच ७ आहेत म्हणजे रामकथा संपूर्ण सांगितलेली आहे. मात्र ग्रंथकाराने मुख्यत: श्रीरामचंद्रांना महाविष्णू नारायणाचा साक्षात् अवतार मानून याची रचना केली असल्याने वर्णनात थोडासा फरक जाणवतो.

**(१२) रामविजय**
(अ. ४३।३५ अ. १९।२२४)

हा ग्रंथ श्रीधर स्वामींनीं ओवीबद्ध मराठी भाषेत शके १६२५ साली लिहिला. यांत सांगितलेली रामकथा बहुश: एकनाथ महाराजांच्या भावार्थ रामायणावर आधारलेली आहे. परंतु ही अगदी सोप्या व सरळ भाषेत असून व यातील ओव्यांची संख्याही बरीच कमी असल्याने महाराष्ट्रात पूर्वीपासून नित्य वाचनास व पारायणास हा ग्रंथ भाविक जनांमध्ये प्रसिद्ध आहे. श्री साईबाबांनी आपल्या निर्वाणाच्या आधी वझे नावाच्या एका भक्ताकडून हा ग्रंथ १४ दिवस वाचवून घेऊन ऐकला होता.

**(१३) विवेकसिंधु**
(अ. २७ ओ. ३६)

हा ग्रंथ आद्यकवि मुकुंदराज यांनी शके ११९० म्हणजे सुमारे ८०० वर्षांपूर्वी ऽमऱ्हाटी' भाषेत लिहिला असून याचा मुख्य विषय अद्वैतवाद (जीव व ब्रम्ह किंवा जगत व ब्रम्ह यांची एकता) आहे. ग्रंथकाराच्या स्वत:च्याच शब्दात सांगावयाचे म्हणजे :–

**ऽउपनिशदांचे निर्मथन । करोनि ग्रंथ केला निर्माण ।।**

**(१४) विद्यारण्यांची पंचदशी**

(अ. २७ ओ. १४५)

हा ग्रंथ महापंडित विद्यारण्य यांनी सर्व उपनिषदांचे सार काढून मोठ्या चातुर्याने रचला आहे. संस्कृत भाषेत वेदांतावर पुष्कळ ग्रंथ आहेत. परंतु पंचदशीसारखा सुबोध, कडीदार व सर्वमान्य ग्रंथ दुसरा नाही असे कोणीही अद्वैतवादी कबूल करील.

अमरावतीचे प्रसिद्ध वकील, राजकारणी आणि त्याकाळचे लेजिस्लेटीव कौन्सिलचे मेंबर तसेच संस्कृत व मराठी भाषेचे विद्वान कै. दादासाहेब खापर्डे यांचे शिरडीत बाबांजवळ-वास्तव्य असता ते धार्मिक ग्रंथांच्या अभ्या–साचा वर्ग घेत असत. त्यात या पंचदशीचा मुख्य समावेश होता आणि उपासनी महाराजांसारखे शास्त्री घराण्यातले संस्कृतज्ञही आदराने शिकण्यास हजर राहत असत. कै. खापर्डे इतके विद्वान असूनही बाबांसमोर वादविवादाकरिता कधीही तोंड उघडत नसत आणि नम्रपणाने मूकवृत्तीने त्यांचेपुढे बसत असत.

### (१५) निश्चलदासकृत विचारसागर

(अ. २१ ओ. ३१)

हा ऽऽविचारसागर'' ग्रंथ मूळ संस्कृत ऽऽपंचदशी'' (वर क्रमांक १४ पहा) च्या आधारे उत्तर भारतातील महात्मा निश्चलदास यांनी सामान्य माणसांना समजण्याकरिता हिन्दी भाषेत सन १८४९ साली लिहीला. अर्थातच् या ग्रंथाचा विषय अद्वैतवाद आणि उद्देश ब्रम्हसाक्षात्कार असल्याने हा प्रमेय ग्रंथ मानला जातो. या ग्रंथाची बंगाली, मराठी, गुजराती व इंग्रजी भाषांतरे झालेली आहेत यावरून याची लोकप्रियता व लोकोपयोगिता सिद्ध होते.

हा ग्रंथ कै. विनायक हरिश्चन्द्र ठाकूर यांना बेळगावनजिक वडगावी प्रसिद्ध कानडी संत अप्पा महाराज यांनी वाचावयास दिला व सांगितले. की याचे पठण व मनन करा म्हणजे पुढे तुम्हांला एका महापुरुषाचा संगम घडेल व ते तुम्हांला पुढील कर्तव्याचा उपदेश करतील. श्रीसाईसच्चरिताच्या २१ व्या अध्यायात वर्णन केल्याप्रमाणे त्यांची पुढे श्रीसाईबाबांशी खरोखरीच भेट झाली आणि –

"तयासी म्हणती साईनाथ । अप्पांनी सांगितले ते यथार्थ ।
परी जेव्हां ते येईल कृतीत । पूर्ण मनोरथ तै होती ॥६९॥

यावरून या ग्रंथाचे बाबांनादेखिल महत्त्व माहित होते.

(१६) दासगणूकृत संतकथामृत व भक्तलीलामृत
(अ. २ ओ. २५, २६ व २७)

हे दासगणू म्हणजे कै. गणेश दत्तात्रय सहस्त्रबुद्धे हे पोलिसमध्ये हवालदार होते व त्यांना तमाशातील लावण्या रचण्याचा नाद होता. बाबांच्या सान्निध्यात आल्यावर बाबांनी त्यांना ही दोन्ही सोडावयास लावून त्यांचेकडून त्याकाळच्या (अर्वाचीन) संतांच्या चरित्रावर वरील दोन ओवीबद्ध ग्रंथ शके १८२८ व १८३० मध्ये लिहवून घेतले. यातील श्रीसाईबाबांबद्दलचे ४ अध्याय शिरडी संस्थानने प्रसिद्ध केले आहेत. त्यातील बाबांनी कै. नानासाहेब चांदोरकरांना केलेला उपदेश फारच वाचनीय व मननीय आहे. श्रीसाईसच्चरित प्रसिद्ध व्हाव याचे आधी साईभक्त याच अध्यायांचे पठण करीत असत. उदा. अध्याय १३ मध्ये नारायण गांवच्या भिमाजी पाटील यांचा कफक्षय बरा झाल्यावर त्यांनी स्वतः व आपल्या गावकऱ्यातही श्री सत्यनारायणाची पूजा करताना हेच अध्याय पोथी म्हणून वाचण्याचा प्रघात पाडला होता –

"जन सत्यनारायण कथा । पाटील अर्वाचीन भक्तलीलामृत ।
दासगणूकृत साईचरिता । सप्रेमा वाचीत ॥" ओ. १८३ ॥

दासगणू ९५ वर्षे म्हणजे बाबांनंतर ४४ वर्षे जगले. आणि त्यांनी खूब वाङ्मय सेवा केली. शके १८४७ साली संतचरित्रावर "भक्तिसारामृत" म्हणून आणखी एक ग्रंथ लिहिला. त्यांनी रचलेली श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी अजूनही साईभक्तांची आवडती आहेच परंतू त्यांच्या श्रीगजाननविजय (शेगांवच्या गजानन महाराजांचे चरित्र) व श्रीमदाद्यशंकराचार्य चरितामृत या पोथ्याही धार्मिक वाङ्मयात प्रसिद्ध आहेत.

(१७) हरिवरदा
(अ. १९ ओ. २२२)

हा ग्रंथ म्हणजे संत कृष्णदयार्णव यांनी लिहीलेला भागवताच्या १० व्या स्कंधावरील (श्रीकृष्णचरित्रावरील) ओवीबद्ध मराठीत टीका होय. त्यांनी हा ग्रंथ शके १८८५ साली पूर्ण केला. यात मुख्यतः श्रीकृष्णांचे चरित्र वर्णन केलेले असले तरी भक्तीचे विवेचनही भरपूर आहे.

**(१८) ईशावास्योपनिषद्**
(अ. २० ओ १६)

उपनिषदांना वेदांचा अंतिम भाग (आरण्यक किंवा ब्राम्हण) असल्याने वेदान्त असेही म्हणतात या सर्वांत परब्रम्ह परमेश्वराच्या निर्गुण व सगुण स्वरूपांचे तत्त्व नाना प्रकारांनी समजावून सांगितलेले आहे. तशी उपनिषदे बरीच (शंभराचे वर) आहेत. परंतु त्यात ११ अतिप्रसिद्ध आहेत. ईशावास्य हे त्यातीलच छोटेसे १८ श्लोकांचेच परंतु अत्यंत महत्वाचे उपनिषद आहे. हे संस्कृतमध्ये असल्याने दासगणूंनी त्याचे ओवीबद्ध मराठी भाषांतर करण्याचे ठरविले या उपनिषदाचा पहिला श्लोक म्हणजे वेदांच्या तत्वज्ञानांचे सारच म्हणता येईल –

**ईशावास्यमिदँ सर्वं यत्किंच जगत्यां जगत् ।**
**तेन त्यक्तेन भुञ्जीथा मा गृधः कस्य स्विद्धनम् ॥**

(अखिल ब्रम्हांडात जे काहीं जड चेतनस्वरूप जगत आहे. ते सर्व ईश्वराने व्याप्त आहे. म्हणून हे लक्षात ठेवून त्याचा त्यागपूर्वक उपभोग घेत जा. त्यात आसक्त होऊ नका (कारण) हे धन कोणाचे आहे?

याच श्लोकाच्या गूढार्थाबद्दल दासगणूंना शंका होती म्हणून ते बाबांजवळ गेले आणि बाबांनी कै. काकासाहेब दीक्षितांचे मोलकरणीकडून किती चमत्कारिकपणे त्यांचे शंकानिरसन केले हे प्रसिद्धच आहे.

**(१९) छांदोग्य उपनिषद्**
(अ. १९ ओ. २२४)

हेही वर म्हटल्याप्रमाणे ११ अतिप्रसिद्ध उपनिषदांपैकी एक आहे. हे बरेच मोठे आहे. परंतु गूढ तात्विक विचार नित्य परिचयाच्या उदाहरणांनी तसेच

संवाद, आख्यायिका, शब्दचमत्कृती आदीच्या सहाय्याने सुबोध करून सांगण्याची धाटणी, सुस्पष्ट विचार, सुटसुटीतपणा व प्रासादिकपणा या गुणसमच्चयामुळे या उपनिषदाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

यात याज्ञवल्क्यांचे गुरू उद्दालक आरुणि ऋषिंचे तत्वज्ञान आढळते. तसेच दधिची, शांडिल्य आणि सनत्कुमार या उपनिषदकालीन तीन सर्वश्रेष्ठ तत्वज्ञ आचार्यांचे तत्वज्ञानही प्रस्तुत उपनिषदात ग्रंथित केलेले आहे.

(२०) दशावतार स्तोत्र व चित्रे

ही सध्या फारशी प्रचलित नाहींत व पाहण्यातही येत नाहींत परंतु खालील श्लोकात दिलेल्या श्रीविष्णु भगवानांच्या दहा अवतारांचे वर्णन व चित्रे त्यात असावीत असे वाटते.

**मत्स्यः कूर्मो वराहश्च नरसिंहोथ वामनः ।**
**रामो रामश्च कृष्णश्च बुद्धः कल्की च ते दशः ।।**

## नांदा सौख्यभरे

ग्वाल्हेरचे सुविख्यात साईभक्त श्री. दिनकररावजी डी. सकपाळ यांचे ज्येष्ठ पुत्र चि. किशोरकुमार यांचा शुभविवाह मुंबईचे श्री. बी. के. कदम मुलुंड यांची सुकन्या चि. सौ. कां. ज्योति हिजबरोबर २० मार्च १९८३ रोजी सकाळी १०–३० वा. श्री कच्छी लोहाणी महाजनवाडी राम रतन त्रिवेदी मार्ग, मुलुंड येथे थाटाने साजरा झाला.

वधुवरांचे हार्दिक अभिनंदन

# रामावतार साईबाबा

—श्री. पां. बा. भुतकर
२३।१६७५
अभ्युदयनगर
काळाचौकी, मुंबई ४०० ०३३

● कोणताही संत अगर महात्मा कधीही मृत होत नसतो. त्यांचा जन्मच हा मुळी अगम्य, अर्तक्य असतो. पुष्कळशा संताच्या बाबतीत ज्याला आपण लौकिक दृष्टया जन्म म्हणतो त्याचासुद्धा पत्ता नसतो. साईबाबांच्या बाबतीत देखील हीच गोष्ट सर्वस्वी लागू पडते. तऱ्हेतऱ्हेनें प्रयत्न करूनही त्यांच्या आईवडिलांचा किंवा जन्मग्रामाचा पत्ता अद्यापपर्यंत लागलेला नाहीं. जन्म—मरणाच्या फेऱ्यातून मुक्त असलेल्या संतांचे कार्य एकच ते म्हणजे लोकांना योग्य मार्गदर्शन करणे व त्यांचे जीवन सुखमय बनविणे. त्यांच्याबाबतीत ते मृत झाले असे म्हणणे हेच चूक आहे.

महाराज ज्ञानोबा काय गेले ।
तीन शतकांनी दर्शन दिधले ।
नाथ महाराज भेटूनि आले ।
उपकार केले जगावर ॥

सर्वसामान्य लोकांच्या बाबतीत मरण ही अटळ गोष्ट आहे. शतकानुशतके मरणावर विजय मिळविण्याचे प्रयत्न चालूच आहेत. पण अद्यापपर्यंत तरी कोणी यशस्वी झालेला नाहीं. मृत्युवर विजय हा फक्त संत महात्म्यांनीच मिळविलेला आहे.

अनतापाठी चिकटले मरण ।
एकाहूनि एक अभिन्न ।
मरण जीव प्रकृति लक्षण ।
जीवाचे जीवन ती विकृति ॥
मरण मारूनि जे उरती ।

पाय काळाचे शिरी जे देवी ।
तया काय आयुर्दायाची क्षिती ।
अवतरती जे स्वेच्छेने ॥

श्रीराम, श्रीकृष्ण याना आपण भगवंत असे मानतो. त्यांचे पूजन, स्तवन व मनन करतो; त्यांची मोठमोठाली मंदिरे बांधतो. असे असले तरी प्रथम ते मानवी स्वरूपातच पृथ्वीवर अवतरले होते. अयोध्यापती श्रीराम व द्वारकाधिश श्रीकृष्ण हे मानवी स्वरूपातच भारतात अवतीर्ण झाले होते. श्रीरामाने त्या काळचे माजलेले राक्षस व रावण यांचा वध करून लोकांचे यज्ञयाग व्यवस्थित रितीने पार पाडण्याचे कार्य केले. श्रीकृष्णानेही कंस, चाणूर वगैरे पासून लोकांना जो त्रास होत होता त्या असूरांचा वध केला. व लोकांना भयमुक्त केले. थोडक्यात सांगायचे म्हणजे प्रत्येक अवताराचे कार्य एकच होते. लोकांची सेवा करणे त्यांची दुःखे दूर करणे व त्यांचे जीवन सुखमय बनविणे.

साईबाबांचे बाबतीत विचार केल्यास असे आढळून येते की दीन–दुबळ्यां–ची सेवा करण्यातच त्यांचे आयुष्य खर्ची पडले. महामारीची साथ गावात येण्याचा धोका त्यांनी स्वतः पीठ दळून त्याचा तोडगा करून पिटाळून लावला. दादासाहेब खापर्डे यांच्या लहान मुलास प्लेगच्या गाठी आल्यानंतर स्वतःच्या अंगावर त्या घेऊन त्याला रोगमुक्त केले. लोहाराचे पोर त्याच्या बायकोचे भान न राहिल्यामुळे भट्टीत पडले त्याला बाबांनी पेटलेल्या धुनीत हात घालून वाचवले, व आपला हात पोळून घेतला. अशी शेकडो उदाहरणे आहेत. तुकाराम महाराजांनी देव कोठे आहे याचे विवेचन पूर्वीच केले आहे.

जे कां रंजले गांजले ।
त्यासी म्हणे जो आपुले ।
तोचि संत ओळखावा ।
देव तेथेचि जाणावा ॥

साईबाबा महान संत होते हे पाहिल्यानंतर बाबा हे कोणाचे अवतार होते असा प्रश्न निर्माण होतो. साईबाबा हे श्रीदत्ताचा अवतार होते. असे काही लोक म्हणतात तर इतर काहीजण त्यांना अक्कलकोटच्या स्वामी समर्थां–

चा अवतार मानतात. सर्वच लोक त्यांना या ना त्या देवाचा अवतार नाम तातत्र हे निःसंशय आहे. माझ्या मते साईबाबा हे प्रत्यक्ष श्री रामाचेच अवतार आहेत याबाबतीत समाधि मंदिरात दुपारी म्हटले जाणारे कवनच याची खात्री देईल.

अजन्माद्यमेकं परब्रम्ह साक्षात् ।
स्वयं संभवं राममेवावतीर्णम् ।
भवद्दर्शनात संपुनीतः प्रभोऽहं ।
नमामीश्वरं सद्गुरुं साईनाथं ॥

जे जन्माविरहित प्रत्यक्ष आहे तो प्रत्यक्ष श्री रामाचाच अवतार आहे. हे प्रभो तुझ्या दर्शनाने मी पावन झालो आहे. अशा प्रत्यक्ष ईश्वरच असणाऱ्या श्री सद्गुरु साईनाथांना मी प्रणाम करतो.

卐

## बाबांच्या उदीचा व चरित्र पारायणाचा अनुभव

—श्री. मनोहर सावंत
'उन्मेष' ८२।८ जुना प्रभादेवी रस्ता
वरळी, मुंबई ४०० ०२५

● श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी येथील भुतपूर्व कार्यकारी विश्वस्त व साईलीला मासिकाचे पूर्वीचे संपादक कै. श्री. नागेशराव सावंत यांच्या संपूर्ण घराण्यावर श्री साईबाबांची कृपा दृष्टी आहे याचा अनुभव आम्हांस वारंवार येत असतो. जीवनात बाबांच्या कृपेच्या अगणित गोष्टी घडल्या व अजुनही घडत आहेतच. केव्हांही घराबाहेर पडताना आमच्या घरातील प्रत्येकजण नियमितपणे श्री साईबाबांची विभूती लावल्या शिवाय आम्ही बाहेर पडत नाहीं. हा अगदी नियम झाला आहे. व त्याला अपवाद आमची नात किंवा लहान नातूही नाहींत.

जॉन्सन् अँड जॉन्सन् या कंपनीच्या भांडूप येथील प्लँटमध्ये माझा मुलगा चि. सुहास हा प्लँट इंजिनियर म्हणून काम करतो. गेल्या वर्षी चि. सुहास सपत्नीक स्वतःच्या गाडीतून काहीं खाजगी कामाकरिता सकाळी पुण्याला गेला व दुपारी तेथुन परत निघाला. बरोबर त्याची मुलगी चि. सोनलही होती. पुण्याहून परत येताना आमची सुन सौ. वीणा हिला काहीतरी वाटले म्हणून तिने गाडीत; खंडाळ्याच्या घाटात उतरण सुरू होण्याआधी आपल्या जवळील उदीची पुडी काढली व गाडीतील सर्वांना लावली. शिवाय गाडीवरही थोडी उदी टाकली. चि. सुहास याची गाडी उतरणीवर असताना एका बाजूला खोल दरी तर दुसऱ्या बाजूला डोंगराचा भाग अशी परिस्थिती होती. पुढील वाहतूक थांबली म्हणून चि. सुहासने आपली गाडी मागील गाडीस इशारा करून घाटातच थांबविली. त्याच वेळी मागाहून एक ऑईल टँकर येत होता. त्या ऑईल टँकरचे ब्रेकस् निकामी झाले व तो टँकर वेगात येऊन चि. सुहास याच्या गाडीवर पाठीमागून आदळला. चि. सुहास त्यावेळी जागरूक नव्हता. ऑईल टँकरच्या धडकेने चि. सुहासची गाडी एकदम वेगात् सरकली व ती पुढे उभ्या असलेल्या एस. टी. बसवर आदळली. या अनपेक्षित धक्याने चि. सुहास, सौ. वीणा व चि. सोनल यांच्या मनाची काय परिस्थिती झाली असेल? पुढील एस. टी. वर त्याची गाडी आदळल्यामुळे थोडक्यात निभावले. त्याच्या गाडीची पुढील चाके जराशीसुद्धा डाव्या हाताला वळली असती तर पुढे काय घडले असते याची कल्पनाच करवत नाहीं! इतके असूनही मागे ऑईल टँकर व पुढे एस. टी. ची बस या दोन्हीही अवजड वाहनांशी टक्कर होऊनही चि. सुहास याच्या फियाट गाडीला विशेष नुकसान पोहोचले नाहीं. अपघाताचा पंचनामा झाल्यानंतर तो स्वतःची गाडी काहीं किरकोळ दुरुस्ती करून मुंबईला घेऊन आला. श्री. साईबाबांनी वेळीच आमच्या सुनेला पुढील अपघाताची आगाऊ कल्पना दिली नसती व तिने संरक्षण म्हणून उदीचा वापर केला नसता तर काय घडले असते? श्री साईबाबांनी भक्तांच्या प्राणावर आलेले संकट अशा तऱ्हेने शेवटी निभावून नेले.

आमचे वडील कै. नागेशराव सुमारे ५० वर्षाहून अधिक काळ श्री. साई-बाबांच्या पुण्यतिथीला दसऱ्यास शिर्डीस जात असत व सन १९४० नंतर निंब-वृक्षाच्या मागील इमारतीतील खोली क्र. ३१ मध्ये त्यांचा मुक्काम असे. खोली क्र. ३१ ही त्यांचीच खोली असे समजले जाई. त्यांच्या पश्चात मी पुण्यतिथीच्या उत्सवाला जाण्याची प्रथा चालूच ठेवली आहे. त्याशिवाय वर्षातून

आणखी २।३ वेळा मी सपत्निक शिर्डीला जात असतो. तसेच वर्षातून एकदा बहुधा डिसेंबर महिन्यात श्री साईसत्चरित्र हा ग्रंथ वाचतो. साईसत्चरित्र हा ग्रंथ एका सप्ताहात वाचण्याऐवजी मी तो ग्रंथ चार दिवसात म्हणजे सोमवार ते गुरुवार पर्यंत पुरा करतो. दरवेळी ग्रंथ वाचून पूरा झाल्यावर त्याची प्रचीती मला निश्चितपणे मिळत असते. किंवा काहीतरी चांगले व्हावे अशा स्वार्थानेही
मला निश्चितपणे मिळत असते. किंवा काहीतरी चांगले व्हावे अशा स्वार्थानेही
माझयाकडून न चुकता श्री साईसत्चरित्र वाचले जाते असावे. १९८२ मध्ये मी शेवटच्या आठवडयात सोमवार ते गुरुवार पर्यंत ५३ अध्याय वाचून पूर्ण केले व त्याचा अनुभव मला पुढील २।३ दिवसात लगेचच मिळाला.

एक म्हणजे मी स्वत: एका खाजगी कंपनीत डायरेक्टर म्हणून काम करीत होतो त्या ठिकाणी मला कल्पना नसतानाही जॉईंट मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून बढती मिळाली. दुसरे म्हणजे माझा मुलगा चि. सुहास जो जॉन्सन अँड जॉन्सन भांडुप प्लॅंटमध्ये काम करीत आहे त्याला दरमहा चांगलीच पगार वाढ मिळाली. व तिसरे व महत्वाचे म्हणजे वांद्र्याला एका हाऊसिंग सोसायटीमध्ये मुलाकरिता एक प्रशस्त ब्लॉक घेण्यासाठी म्हणून नेलेले पैसे श्री साईबाबांनी काहीतरी आयत्या वेळी अडचण निर्माण करून देऊ दिले नाहीत. इतकेच नव्हे तर ते काम पुढे १५ दिवस रेंगाळत ठेवले. असे का व्हावे म्हणून शेवटी मी श्री साईबाबांचा आशिर्वाद मागितला. एका गुरुवारी सकाळी पुजे नंतर टाकले त्या चिठ्ठीमध्ये चक्क या भानगडीत पडू नकोस असा आदेश दिला. अर्थात "नको' असा आदेश मिळाल्याबरोबर मी लगेचच "मला जागा नको" म्हणून त्या सोसायटीला निरोप दिला. त्या ब्लॉकचे पुढे काहीही होवो पण श्री. साईबाबांनी आम्हांला वेळीच सावरले असे मी त्यांच्यावरील प्रगाढ विश्वासामुळे गृहीत धरते. कदाचित वाचलेले पैसे दुसऱ्या एखाद्या चांगल्या गोष्टीकरिता लागावयाचे असतील. कोण जाणे बाबांची काय इच्छा आहे.

श्री. साईबाबांची कृपा माझ्यावर व आमच्या सर्व कुटुंबियांवर कायम राहावी ही श्री बाबांच्या चरणी प्रार्थना !

☆

# अमृतकुंभ

श्री. गणपतराव सामंत, एम्. ए.
निवासी व्यवस्थापक
श्री महालक्ष्मी मंदिर
मुंबई.

● महाभारत, रामायण, ज्ञानेश्वरी, दासबोध' श्रीसाईसच्चरित इत्यादि ग्रंथराज वाचल्या नंतर असे वाटते की हे केवळ चरित्रग्रंथ नसून ऐहिक व पारमार्थिक दैवी ज्ञानग्रंथ आहेत. हे ग्रंथ इतक्या सहजगत्या पद्धतीने लिहीले गेले आहेत की वाचताना दुथडी भरून वाहणाऱ्या निर्मळ व पवित्र गंगा–माईची आठवण येते. या ग्रंथात कृत्रिमता तर नाहीच नाही तर प्रत्येक ओवी म्हणजे जिवंत काव्य वाटते. वरील ग्रंथराज वाचताना श्रीसाईभक्त दासगणूंच्या खालील ओवींची महति पटते.

हे शारदे वाग्विलासिनी । तूं शब्दसृष्टिची स्वामिनी ।
तुझे आस्तित्व म्हणूनि । व्यवहार चालती जगताचे ।
तूं ग्रंथकाराची देवता । तूं भूषण देशाचे सर्वथा ।
तुझी अवघ्यात अगाध सत्ता । नमो तुजसी जगदंबे ॥

खरा भक्त देव; साधुसंत यांची एकमेकाशी तुलना करून अमूक देव किंवा साधू सर्वश्रेष्ठ असे मुळीच म्हणणार नाहीं. प्रत्येकाच्या आवडी–निवडी वेगवेगळ्या असतात म्हणून खरा भक्त आपला देव, ग्रंथ ठरवून इतरांवर टीका न करता आपल्या आराध्य देवाची मनोभावे सेवा करील – जागृति ठेवील तद्वतच आवडणाऱ्या ग्रंथराजाची पारायणे करील.

मी अनेक ग्रंथ वाचले व अनेक साधुसंतांचे दर्शन घेतले पण श्रीसाई–बाबांवर प्रेम जडले. श्रीसाई सच्चरितावर सर्व भक्ति व श्रद्धा एकत्रित केली. अनेक पारायणे केली. अनुभव घेतले. त्यामुळे श्रीसाईबाबांच्या शिरडीत वावरतांना प्रत्येक गोष्टीचे वास्तूचे महत्व पटते व ती वास्तू पाहतांना साई–चरित्रातील ओव्या समोर येतात.

'श्रीसाईसच्चरित, हा प्रासादिक ग्रंथ आहे. श्रीसाईबाबांच्या जीवनावर आधारित महाकाव्य आहे. या ग्रंथातील निर्मळ ओव्या वाचताना बाबांचे जीवन तरुणपण, दररोजचे कार्यक्रम, चमत्कार, तत्त्वज्ञान यांची प्रचिती येते. बाबांच्या कृपेचे फळ म्हणजेच हेमाडपंत (दाभोलकर) रचित श्रीसाईसच्चरित.

बाबांची अमृतमय वाणी हेमाडपंतांनी ओवीबद्ध करून भक्तांसाठी अजरामर करून ठेविली.

श्री साईंस प्रिय असलेली श्रद्धा आणि सबूरी असल्यानंतर अशक्य असे काहीच नाहीं.

इष्टानिष्ट सुखदुःख । संचितानुसार अमृत वा विख ।
हे प्रवाहपतित द्वंद्व देख । धरी न हरिख वा शोक ॥
जे जे येईल ते ते साहे । अल्ला मालिक वाली आहे ।
सदा तयाच्या चिंतनी राहे । काळजी वाहे तो सारी ॥
होणार ते होऊ द्या यथेष्ट । सद्गुरुचिंतन आपुले अभिष्ट ।
संकल्प–विकल्प होतील नष्ट । संचित अनिष्ट टळेल ॥

साईचरितांतील वरील ओव्या व दासबोधातील खालील श्लोक तेच सांगतात.

मना त्वांचि रे पूर्व संचित केले ।
तयासारिखे भोगणे प्राप्त झाले ॥
मनीं मानव व्यर्थ चिंता वाहाते ।
अकस्मात होणार होऊनि जाते ॥
घडे भोगणे सर्वहि कर्मयोगे ।
मतीमंद ते खेद मानी वियोगें ॥

श्री शनिमहात्म्यातील खालील ओव्या वरील विधानास पोषकच आहेत.

जे जें पुढे होणार । म्हणोनि बुद्धि सुचे तद्नुसार ।
तरी जे असेल लिखिताक्षर । तैसे आता होईल ॥
ऐसी क्रमिलीं वर्षे दोन । तोंवरी दुःख सोशिले अति दारुण ।

ऐसे कर्माचे विदान । भोगिल्यावीण सुटेना ॥
राव म्हणे ऐक पतिव्रते । हा कर्मभोग जाण निरुते ।
ग्रह दशा फिरली माते । हे कर्तृत्व देवाचे ॥

ग्रहदशेतून कोणी सुटत नाहीं. परमेश्वरानी केलेली ही ग्रहदशा प्रत्यक्ष परमेश्वराने मानव देह धारण केल्यावर त्यालाहि भोगावी लागली. श्रीरामचंद्र, श्रीकृष्ण या अवतारांनासुद्धा ही ग्रहदशा सुटली नाहीं.

दैवजात दुःखे भरता दोष ना कुणाचा ।
पराधिन आहे जगती पुत्र मानवाचा ॥

राजा विक्रमाच्या बाबतीत जे घडले तसेच राजा भद्रश्रवाच्या बाबतीत घडले हे श्रीलक्ष्मीमहात्म्यात दिसून येते.

होता अवकृपा लक्ष्मीची । मात्रा चालेना कोणाची ।
फळे आपल्या कर्माची । भोगावीच लागती ॥

"संचितानुसार अमृत वा वीख" हे बाबांचे उद्‌गार म्हणजे प्रारब्धयोग देव व दैव यात दैव जर श्रेष्ठ असेल तर देव देव करून भक्तिमार्गात पडण्यात काय अर्थ आहे? देवाने जरी प्रत्येकाचे दैव लिहिले असले तरी साधु-सत्पुरुषांना 'रेखेवरी मारी मेख' असे सामर्थ्य त्याच परमेश्वराने दिले आहे.

उत्कट भक्तिमार्गातून निर्माण झालेली सत्पुरुषावरील अढळ श्रद्धा दैव बदलू शकते याची अनेक उदाहरणे आपण श्रीसाईसच्चरितात पाहतो. भोग हे भोगलेच पाहिजेत पण अनेक वेळा भक्त अति संकटात असतांना श्रीसाईंनी त्या भक्ताचे भोग आपणावर घेतले अशी अनेक उदाहरणे इतर साधुसंताच्या चरित्रात आढळतात.

प्रभू श्रीरामचंद्राच्या सीतामाईला रावणाने पळवून नेले. ज्या श्रीकृष्णाने अर्जुनाचे सारथ्य करून पांडवाना जय मिळवून दिला त्या भगवान् श्रीकृष्णाचा अंत पारध्याकडून झाला. प्रत्यक्ष परमेश्वराला आपले भोग टाळता आले नाहीत? ते शक्य होते पण परमेश्वराने मानवस्वरूपात जन्मास येऊन आपणास असे दाखवून दिले की प्रारब्ध भोगूनच संपविले पाहिजे. पण मानवांना

आपले महत्त्व पटविण्यासाठी व दैवावरसुद्धा देव मात करू शकतो हे दाखविण्यासाठी साधुसंतांना पृथ्वीतलावर पाठवून त्यांच्याद्वारे दैवी चमत्कार घडवून आणतो. साधुसंताचे शब्द खरे करण्यासाठी खुद्द परमेश्वरच चमत्कार करतो.

साधुसंतावरील श्रद्धा ही उपयोगी ठरते. जीवन सुसह्य होते. चमत्कार घडून येतात. भक्तिमार्गात श्रद्धा व सबूरी मजबूत असल्यावर सर्व संकटांना निर्धास्तपणे तोंड देण्याची शक्ति निर्माण होते. एवढेच नव्हे तर प्रारब्धावर मात करता येते. म्हणूनच बाबांची श्रद्धा व सबूरीवर वारंवार भर असे– शिकवण असे.

इतर देव सारे मायिक । गुरुचि शाश्वत देव एक ।
चरणी ठेविता विश्वास देख । रेखेवरी मेख मारी तो ॥
बैस आता सोडी खंत । खंत न करिती विचारवंत ।
झाला तुझिया भोक्तृत्वा अंत । पाय शिरडीत टाकिता ॥
आकंठ संकटार्णवी बुडाला । हो का महद्दुःखगर्तेत गढला ।
जो या मशिदमाईची पायरी चढला । सुखा आरूढला तो जाणा ॥
तीचि कनवाळू सर्वांची आई । हांकेसरसी धांवत येई ।
कळवळून कडिये घेई । जाण साई लेकरांची ॥

अशी परिस्थिती निर्माण करण्यासाठी श्रीसाई काय सांगतात –

दोन हात एक माथा । स्थैर्य श्रद्धा अनन्यता ।
नलगे दुजे साईनाथा । एक कृतज्ञता ते व्हावी ॥
ऐसे हे संत कृपाळ । प्राप्त होता उदयकाळ ।
दर्शने हरिती भवजंजाळ । काळहि मागे परतविती ॥
कृतांताच्या दाढेतून । काढीन मी निजभक्ता ओढून ।
करिता केवळ मत्कथा श्रवण । रोग निरसन होईल ॥
लक्ष लावी जो मजकडे । नाहीं तयासी कैचेहि साकडे ।
तोचि माझा जैं विसर पडे । माया कोरडे उडवी तैं ॥

आपण कलियुगात वावरत आहोत. सर्वसामान्य माणसाची जगण्यासाठी धडपड चालू आहे. या धडपडीत व इतर धाकाधुकीत इतका वेळ जातो की हे सर्व जीवन व्यवहार थांबवून किंवा संपवून शास्त्रोक्त पद्धतीने आचार–नियम

पाळून पूजा–अर्चा करून भक्तिमार्ग चालू ठेवणे अशक्यच आहे. दोलायमान जीवन, अनिश्चितता, दररोज बदलणारे राजकारण, जगण्यासाठी धडपड यातून सुटून भक्तिमार्गाचा कसा अवलंब करायचा ? म्हणजेच त्यासाठी सर्व नियम टाळून शॉर्टकट म्हणजे नजिकचा मार्ग काढणे आवश्यक आहे.

"श्रीसाईसच्चरित" ही बाबांची जीवंत गाथा आहे. प्रत्येक शब्दावर माझा विश्वास आहे. याच्याहि पलिकडे जाऊन मी असे म्हणू शकतो की सर्व जगात एकच ग्रंथ आणि तो म्हणजे "श्रीसाईसच्चरित"। (इतर ग्रथांचा आदर राखून) व सर्व जगांत एकच परमेश्वर तो म्हणजे 'श्रीसाई' (इतर देवांचा आदर राखून) साक्षात् ईश्वर म्हणजेच साई.

प्रारब्ध जर अटळ आहे तर भोग हे भोगलेच पाहिजेत पण याच प्रारब्धात जर साईबाबांच्या भक्तीचा समावेश असला तर तो योगच समजला पाहिजे. घराण्याच्या सस्कारातून भक्तियोग निर्माण होतो पण तेच संस्कार घराण्यात नसतील तर अनेक संकटे निर्माण झाल्यामुळे व प्रयत्नांची पराकाष्टा करून संकटे जात नसतील तेव्हां आता काहीच मार्ग नाहीं म्हणून शेवटी भक्ति–मार्गाकडे मन वळले जाते.

कर्माच्या गती असती गहना । जे जे होणार ते कदा चुकेना ।
ते ते भोगल्याविन सुटेना । देवादिकां सर्वांसी ।। (शनिमहात्म्य)

भक्तास ताकद येते व भक्तावरहि साईकृपा प्रसादाने मात करता येते.

मग जो गाई वाडे कोडे । माझे चरित्र माझे पवाडे ।
तयाचिया मी मागेपुढे । चोहिंकडे उभाचि ।।
जो मजलागी अनन्य शरण । विश्वासयुक्त करी मद्‌भजन ।
माझे चिंतन माझे स्मरण । तयाचे उद्धरण ब्रीद माझे ।।
कृतांताच्या दाढेतून । काढीन मी निजभक्ता ओढून ।
करिता केवळ मत्कथा श्रवण । रोगनिरसन होईल ।।

श्रीसाईबाबा नाथसंप्रदायी सत्पुरुष होते व जरी त्यांनी देह शिरडीत ठेवला तरी त्यांचा संचार सर्वत्र आहे याबद्दल असंख्य भक्तांना अनुभव आहे. शिरडी एक जागृत देवस्थान आहे. भक्तगणांचे अगणित प्रेम तेथे ओतले जाते

आहे. कधी कधी असेहिं वाटते की श्रीसाईबाबा या अनिर्बंध प्रेमामळे परत अवतरतील काय? शक्य आहे. श्रीसाईसच्चरित्रात तसे लिहिले गेले आहे.

आठा वर्षांचा बाळ जनी । प्रकट होईन मी मागुतेनी ।
ऐसे महाराज भक्तांलागूनी । आहेति सांगनी राहिले ॥
आठ वर्षांची सुंदर कांति । चतुर्भूज आयुधे हाती ।
देवकीपुढे बंदी शाळेप्रति । कृष्णमूर्ति प्रकटली ॥ (श्रीसाईसच्चरित)
आठा वर्षांची मूर्ति । असंभाव्य पहिली दीप्ति ।
तेजें दशदिशा उजळती । तेथें लपती शशिसूर्य ॥ (श्रीहरिविजय)

श्रीसाईबाबांबद्दल माझे आजपर्यंत जे वाचन झाले जे अनुभव आले, ज्या अनेक सत्पुरुषांशी बोलणे झाले त्यानुसार बाबांचा कालावधी सन १८३८ ते १९१८ हा आहे.

बाबांच्या जन्माविषयी कांहीही कथा असोत बाबा ईश्वरी अवतार होते हे मान्यच करावे लागेल. साईचरित्रात लिहिल्याप्रमाणे बाबा आठ वर्षांचे बालक अवतीर्ण होवोत किंवा समाधि घेण्यानंतर आठ वर्षांनी येवोत पण माझी अढळ श्रद्धा आहे की बाबांचा संचार चालू आहे व याची प्रचिती अनेक भक्त घेत आहेत. सध्या तरी अनेक सत्पुरुष हा बाबांचा अवतार आहे असे म्हणणे वादातीत होईल. बाबाच आपल्या निस्सीम भक्तांना आपल्या नवीन अवताराकडे खेचतील.

बाबांनी आपले चरित्र हेमाडपंतांकडून लिहून घेतले म्हणा किंवा कै. दाभोलकरांनी शब्दांकन केले म्हणा. त्या ग्रंथात फक्त सत्य आहे अशी भाविकांची धारणा आहे. माझीही मनोमन खात्री आहे. मग बाबांनी मानवी रूपांत जन्म घेतला आहे असे मानावेच लागेल.

श्रीसाईसच्चरिताची आज घरोघरी पारायणे होत आहेत. असा हा श्रीसाईसच्चरितरूपी "अमृतकुंभ" घरोघरी असावा हीच प्रार्थना.

श्रीटेंबेस्वामीच्या शब्दांत —

जो चितीता तत्क्षणी वारि मोहा ।
त्याच्या पदी सतत ठेवि देहा ।

मोहांतका तारि मला परेशा ।
न तुजवांचोनि शरण्यधिशा ॥

अशी प्रार्थना करून श्रीसाईसच्चरिताची पारायणे घडोत व श्रीनृसिंह–सरस्वतीचा "चितीतमनोरथासिद्धिरस्तु" असा आशिर्वाद घेऊया.

★

# भक्ति महिमा

–श्री. चंद्रकांत श्रीराम गरगटे
२९९ गुरुवार पेठ,
सातारा ४१५ ००२

● 'कामना ठेवून भक्ती केल्यास श्री साईबाबा फळ देतातच परंतु फळाची आशा न धरल्यास स्वतः श्री साईबाबा प्रत्यक्ष मिळतात'

वरील उक्तीप्रमाणे आज सर्व श्रीसाई भक्तांना प्रचीती येत असल्याचे जाणवते.

१५ ऑक्टोबर १९१८, मंगळवार या दिवशी श्रीसाईबाबा समाधिस्थ झाले. परंतु श्रीसाईबाबा आज देखील कित्येक भक्तांना दृष्टांत रूपाने दर्शन देतात. याचा अनुभव अनेक भक्तांना येत आहे.

या कलीयुगामध्ये श्री. बाबांचा अवतार म्हणजे या जगास तारण्याकरिता मिळालेले वरदानच आहे. मानवी जीवन हे क्षणभंगूर आहे. आणि या क्षणभंगूर जीवनाचे सार्थक करून घ्यावयाचे असेल तर भक्ती हेच त्याचे माध्यम (साधन) आहे.

मानवी जीवन ही एक सुगंधी उदबत्ती आहे. उदबत्ती जळते, भोवतीचे वातावरण ती प्रसन्न करते. अगदी शेवटपर्यंत ती जळत राहते. विझेपर्यंत तीचा सुगंध दरवळत असतो. ती विझते पण केव्हां? . . . स्वतःची राख झाल्यावर!

उदबत्ती प्रमाणेच आपलं आयुष्य भक्ती करण्यामध्ये हवन करणं हेच खरं पुण्य होय.

भक्ती करण्यासाठी उपास-तापास, व्रते करावी लागत नाहीत. त्याकरिता आपले तन-मन-धन, श्रीसाईबाबांच्या चरणी अर्पण करून त्याची अखंड सेवा केली पाहिजे. नाहीतर मानवी जन्म घेतल्याचे सार्थक होणार नाहीं.

एक दिवस टिकणारे फूल क्षणभर तरी जगास आनंदीत करते पण दीर्घ-काळ जगणाऱ्या मानवांकडून जगाने किती म्हणून अपेक्षा करावी.

जो मनुष्य मनापासून, अंतःकरणापासून परमेश्वराची भक्ती करतो त्याचे जीवन सुखकर बनते. कारण त्याच्या पाठीशी परमेश्वर सदैव उभाच असतो.

ही जी भक्तीरूपी नदी आहे तिचे श्रद्धा व सबुरी असे दोन किनारे आहेत. भक्तजन हा त्यामधील प्रवाह आहे. अहंकार व मी पणा भयंकर असे मासे व मगर आहेत. अशी ही भयंकर नदी हे भक्तजन तरून जातात. त्याचे कारण श्रीसाईबाबा हे त्याचे उत्तम नावाडी आहेत.

जी अप्राप्य व सर्व सुखांचे सार अशी ही भक्ति होय. श्री साईबाबांच्या कृपेखेरीज त्यांच्या प्रभावाचे ज्ञान होत नाहीं. त्याचे ज्ञान झाल्याखेरीज प्रचिती येत नाहीं व प्रचिती वाचून भक्ती दृढ होत नाहीं.

श्रद्धेखेरीज भक्ती होत नाहीं. भक्ती खेरीज साई द्रवत नाहीत. श्री साईंची लीला म्हणजे अगाध समुद्र आहे. त्याचा थांगपत्ता कोणास तरी लागेल काय? श्री साईबाबा हे केवळ भावाच्या (श्रद्धेच्या) आधीन असतात. म्हणून ममता मद आणि अहंकार यांचा त्याग करून त्यांचे सतत गुणगान गाणे हाच एक पर्याय आहे.

हा भवसागर तरून जाण्यास गुरुखेरीज तो जाता येणार नाहीं.

कोकीळेच्या आवाजात जरी माधुर्य असले तरी तिचा कंठ फुटण्यास जसा वसंत ऋतु यावा लागतो. त्याप्रमाणे मनुष्याजवळ ज्ञान जरी उपलब्ध असले तरी ते फलद्रूप होण्यासाठी त्याला सद्गुरुपासूनच चालना मिळावी लागते.

भक्ती ही स्वतंत्र असून सर्व सुखांची केवळ खाण आहे. परंतु ती सत्संगा-वाचून, मनुष्याच्या हाती लागत नाहीं. आणि पुण्यसंचय गाठी असल्याखेरीज संताची गाठ पडत नाहीं.

दिवसेंदिवस श्री साईबाबांचा प्रचार भक्तांमध्यें वाढत आहे. तेव्हां आपण आपले तन–मन–धन श्रीसाईचरणी अर्पण करणे हेच एक साधन आहे. "भक्ती वाचून प्राप्ती नाहीं" हेच त्यामधील मर्म आहे.

कमळ फुलले की त्यातील मकरंद सेवन करण्यास जसे रानावनांतून भ्रमर धाव घेतात. त्याप्रमाणे सद्गुरुच्या व्यक्तिमत्त्वाची जाणीव होताच; त्यांच्या दर्शनास गावोगावचे लोक झुंडीच्या झुंडी करून धावत येतात. आज ही अवस्था आपणास शिरडी येथे पाहवयास मिळते.

श्री साईबाबा म्हणतात. –

"काया वाचे मने करून अनन्यगतिक होत्साहे जे माझे अहेतूक भजन करतात, त्यांच्याच हृदय कमलात मी निरंतर वास करतो."

मी साईभक्ती परिलुप्त जाहलो, श्री साईचरणी माझे अभिनव प्रेम जडून माझे मायाजनित क्लेश नष्ट झाले. ह्या मोहरूप सागरात श्री साईबाबाच नौकारूप झाले आणि मला परोपरीनें सुखी केले.

★

# भक्ताचा अद्भुत अनुभव

—सौ. सुशीला शंकर चौबळ
दाऊदबाग, अंधेरी (पश्चिम) मुंबई—४०० ०५८

● "जो जो मज भजे जैसा जैसा भावे, तैसा तैसा पावे मीही त्यासी" या ओवीचा अर्थ किती चांगला आहे. आपण देवाला अंतःकरणाने स्मरतो त्याप्रमाणे देवसुद्धा भक्ताच्या हाकेला धावून येतो. या साईबाबांच्या वचनांचा अनुभव आमच्या घरात फार वर्षांपूर्वी खूप चांगला आला आहे; आणि काहीं बाबतीत अजूनही प्रत्ययास येत आहे.

माझी आई डबल न्यूमोनियाने खूपच आजारी होती. २१ दिवस झाले तरी ताप निघेना, डॉक्टरी सर्व उपाय झाले तरी काहीं गूण येईना. घरातील सर्व मंडळी आईचा एवढ्या दिवसाचा आजार काढून हैराण झाली होती. घरात साईबाबांसारखा देव असल्यावर आणखी कोणता देव हवा? म्हणून वडील थोडेफार निश्चित होते. आईची साईबाबांवर खूपच श्रद्धा होती. आम्ही सर्व मुले लहान असल्यामुळे तिची सुश्रुषा करायला एक ख्रिश्चन नर्स ठेवली होती. घरात आईची खोली स्वतंत्र असल्यामुळे रात्री फक्त नर्स व आई आणि भिंतीवर लावलेली साईबाबांची तसबिर एवढेच सोबतीला असायचे.

एके दिवशी रात्री (९–१० च्या सुमारास) आई झोपेमध्ये बोलत होती ते बघ तीघेजण मला न्यायला आलेत, पण साईबाबा त्यांना नेऊन देत नाहींत त्याच रात्री आई खूप 'सिरियस' झाली. २।–२॥ च्या सुमारास डॉक्टर पण नसल्यामुळे आम्ही बाबांवर विश्वास ठेवून बाहेरच्या खोलीत बसलो होतो. (उदीचा उपयोग सर्वत्र करीत होतो.) एवढ्यात नर्स एकदम मोठ्याने ओरडली, आम्हांला वाटले आता आईचे काहीतरी बरे वाईट झाले परंतु प्रत्यक्ष अनुभवास आले ते वेगळेच!

एक आकाशी रंगाचा शालू धारण केलेली तेजस्वी अशी एक देवता घोडेस्वार होऊन दारात (म्हणजे आईच्या खोलीत) आली, तिने प्रथम साई–बाबांना नमस्कार करून पंचारती घेऊन बाबांची आरती केली व ती बाबांना

म्हणाली "उठा उठा" आता या पोरीला आपणच वाचवू शकाल. (ती म्हणजे आमची कुलस्वामीनी एकविरा देवी) आणि त्याबरोबर साईबाबा फोटोतून बाहेर आले व आईच्या अंगावर हात फिरवून नर्सला म्हणाले "उठ तुझी सेवा व माझी कृपा मिळून या बाईला आपण उठवू या" हे सर्व दृश्य ती ख्रिश्चन नर्स बघून घाबरून गेली, नर्सला वाटले हा म्हातारा म्हणजे आईचे वडील भूत होऊन आले काय? म्हणून ती भांबावून गेली. धन्य ती नर्स व तिला दिसलेली साक्षात देवता आणि आनंदाची बातमी म्हणजे साईबाबा आशिर्वाद देऊन गेल्यावर आई आठ दिवसात चांगली बरी झाली व घरात हिंडूफिरू लागली

अशी आहे साईबाबांची लीला, त्यांच्या भक्ताला ते कधीही टाकत नाहींत, कुठच्याही रूपाने येऊन आपल्याला आशीर्वाद देऊन जातात.

नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य, नित्य घ्या प्रचिती अनुभवे !

# साईबाबानी कोडे सोडविले

–सौ. शैला मनोहर पितळे
पितळे वाडी, हनुमान रोड,
विलेपार्ले, मुंबई ५७.

● तो दिवस माझ्या मुलीच्या वार्षिक परिक्षेचा होता. नुकतीच माझी मुलगी कु. श्रद्धा पेपर सोडवून परीक्षेहून आली होती. मी तिला पेपरातील काहीं प्रश्नांची उत्तरे विचारत होते. ती उत्तरे देत होती पण मला काहीं ती उत्तरे बरोबर वाटली नाहींत. गेल्या तिमाही, सहामाही व नऊमाही परिक्षेत तिने

प्रथम क्रमांक मिळवला होता. त्यामुळे वार्षिकला जर कमी मार्क मिळाले तर तिचा नंबर खाली जाईल ह्या विचाराने मी घाबरून गेले होते. तिने दिलेली उत्तरे बरोबर आहेत का? हे तिच्या वर्गशिक्षकांना भेटून विचारावे का? परंतु ते कसे शक्य होईल! "माझ्यापुढे एक मोठे कोडेच पडले!" इतक्यात दरवाजा वरची बेल वाजली. मी दार उघडले तोच एक गृहस्थ हातात साईलीलेचा अंक घेऊन समोर आले. व त्यांनी मला विचारले साईबाबांच्या मूर्ति बनविणारे गृहस्थ येथेच राहतात का? त्या अंकात आमची मूर्तिची जाहिरात छापली होती. मी त्यांना होकारार्थी उत्तर दिले तोच त्यांनी साईलीलेचा अंक माझ्या हातात दिला व म्हटले हा अंक तुमच्याजवळ ठेवा मला तुमचा पत्ता समजला आहे. मी उद्या तुमच्या मिस्टरांना भेटण्यास येईन. साईलीला मासिकाच्या रूपाने बाबा आले व त्यांनी माझे कोडे सोडविले, व जणू मला सांगितले कुठेही जाऊ नकोस धीर धर! मला खरोखरीच धीर आला होता. काहीं दिवसांतच वार्षिक परिक्षेचा निकाल लागला व माझी मुलगी कु. श्रद्धा सर्व वर्गात प्रथम क्रमांक मिळवून पास झाली.

## नामस्मरणाचा महिमा

हा अनुभवसुद्धा माझ्या मुली संबंधिचा आहे. एके दिवशी संध्याकाळी दिवे लागणीच्या वेळेला मी पोळ्या लाटत होते. पोळ्या लाटून झाल्यावर लालबुंद झालेला तवा गॅसवरून ओट्यावर तसाच ठेवून मी बाहेर आले. बाहेर खोलीत माझे मिस्टर श्रीसाईबाबांच्या मूर्तीजवळ दिवाबत्ती करून हातात जपमाळ घेऊन बाबांचा नित्यक्रमाने जप करीत होते इतक्यात माझी मुलगी स्वैपाक घरात गेली व ओट्यावरच्या तव्याला हात लावणार हे पाहताच मी मोठ्याने किंचाळले तवा गरम आहे ऽऽ माझी मुलगी दचकून पुढे जाण्याऐवजी मागे खेचली गेली. व मोठाच अपघात टळला. नाहींतर इतक्या गरम तव्याला तिच्या नाजूक बोटांचा स्पर्श झाला असता तर काय अवस्था झाली असती ह्याची नुसती कल्पनासुद्धा करवत नाहीं.

माझे मिस्टर बाबांचे नामस्मरण करीत असल्यामुळेच हा गंभीर अपघात टळला याची मला खात्री झाली. असा आहे नामस्मरणाचा महिमा अशी आहे आमची धन्य साई माऊली.

# हा घ्या बाबांच्या जीवंत पणाचा पुरावा

—श्री. पी. के. पहाडे
गर्ग बंगला, झेंडा चौक, धरम पेठ, नागपूर

● नसत्या आठवणीने अंगावर भितीचा काटा उभा रहावा असा हा प्रसंग गुरुवार दि. ६ जानेवारी ८३ नेहमी प्रमाणे मी ऑफिस मधून घरी परत येत होतो. सायं. ५॥ ची वेळ होती. रस्ता उताराचा असल्यामुळे माझ्या स्कूटरचा वेग थोडा जास्तच होता. रस्त्यावरील गर्दी ऑफिसेस सुटल्यामळे वाढली होती. इतक्यात स्कूटर समोरुन एक मनुष्य रस्ता ओलांडायला लागला व नेमका माझ्या स्कुटरसमोर आला, त्याला वाचविण्याकरिता मी थोडी बाजूला केली, पण पुढे मोठा दगड आहे याचे भान नसल्यामुळे स्कूटर त्यावर जोरात आदळून गाडी दहा फूट रस्त्याच्या बाजूला फेकली गेली. व मी नेमका रस्त्यावर मध्यभागी फेकला गेलो. नाक तोंड फुटले हाताला बराच मार लागला रक्त वाहू लागले (थोडा वेळ शुद्ध हरपली जमलेल्या लोकांनी मला बाजूला आणले म्हणतात) थोडा सावध होऊन मी घरी आलो आणि श्रीसाईबाबांच्या फोटो समोर त्याच अवस्थेत उभे राहून त्या दिवशी माझ्या हातून घडलेल्या चुकीचे कारण विचारले, की ज्यामुळे मला प्रथमच अशी शिक्षा दिली. त्यानंतर डॉ. कडे जाऊन इंजेक्शन व उपचार करविले.

तोंडावर भयंकर सुज आली होतीच ओठ फार सुजले होते. दोन दिवस झाल्यानंतर देखील ओठांवरील सुज कमी झाली नव्हती. शनिवार दि. ८ रोजी रात्री ८ च्या सुमारास लक्षात आले की आतून ओठ जवळ जवळ १।२ इंच लांब व १ सूत फाटलेला आहे. ते पाहताच डोळ्यात एकदम अश्रू आले आणि म्हणालो बाबा! "इतने रातमें अस्पताल कैसें जावूं इलाज कराने के लिये कल इतवार होनेसे अस्पताल भी बंद रहेगें बाबा! यदी मेरी ये जखम रातभर में थोडी कम हो जाय तो शिरडी आकर सत्यनारायण करूंगा मेरी भक्ति मंजूर करेंगे तो, बाबा! मेरा दर्द कम कर देना", असे म्हणून नामस्मरण करीतच झोप लागली.

आश्चर्य वाटेल वाचकांना. मी दुसऱ्या दिवशी सकाळी ९—१० वाजता उठून आरशात जेव्हां फाटलेले ओठ पुन्हां पाहिले तेव्हां जवळ जवळ ८० टक्के

जागा अगदी भरून आलेली होती. छत्तीस तासात जे घडले नाहीं ते फक्त त्या रात्री १० तासात कसे व्हावे? हा विचार करण्याचा प्रश्न आहे.

केवळ श्री साईबाबांच्या कृपा दृष्टीमुळे मी हातपाय न मोडता अपघातातून बचावलो ही एक गोष्ट व ओठाला झालेली जखम रात्रभरात बरी होणे ही श्री साईबाबांच्या अस्तित्वाची प्रचिती नव्हे काय?

"नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य" हे त्यांचे वचन सर्व साईभक्तांना, बाबा अनुभवाला देतातच. बाबा! आपले नामस्मरण जे करतील त्यांना नेहमी मदत करावी ही प्रार्थना.

☆

'Its beautifully Written and beautifully translated! It makes an impact of ardent devotion. And Baba's photo you have affixed is simply vibrating......'

So says Shri P. K. Kappor of Delhi-6.

'प्रगटे मस्जिदमें साई भगवान!'

A BIG BOOK FOR ONLY Rs. 45/-

Also in English as '**A MISSION DIVINE!**' Rs. 45/-

And in Marathi as '**मशिदीत प्रगटला परमेश्वर!**' Rs. 40/-

Hard bound.

Postage Rs. 4-50 Each : No. V P. P.

Contact : 'PRASHANTI PRAKASHAN',
5, Vasant Apartments, Plot 47, Kastur Park,
Shimpoli Road, Borivali (W.) Bombay 400 092.

# अश्रद्धा हाच मोठा अपराध !

—श्री. प्र. कृ. धुपकर
२१७–६ जवाहर नगर गोरेगांव मुंबई ६२

● एकदा भगवान शंकर आणि पार्वती गंगेच्या मणिकर्णिका घाटावर गप्पा–गोष्टी करत बसले होते. हजारो यात्रेकरूंचा गंगेमध्ये स्नान करत असतांना "हरगंगे, हरगंगे" असा आवाज येत होता.

देवी पार्वतीने यात्रेकरूंना स्नान करताना बघून भगवान शंकरांना विचारले "नाथ, रोज हजारो यात्रेकरू गंगेत स्नान करतात. गंगेत स्नान केल्याने सर्व पाप नाहीसे होते असे आपले शास्त्र सांगते तर निष्पाप झालेले सर्वजण मृत्यु नंतर कैलास किंवा वैकुंठाला जात असतील ना?

'हो, तेथेच जातात, भगवान शंकरांनी थोडक्यात उत्तर दिले.

"नाथ, तुमचे उत्तर बरोबर असेल तर मग कैलास आणि वैकुंठ रिकामे कसे?

"देवी, गंगेमध्ये स्नान करणाऱ्यांची पापे जळून भस्म होतात ही गोष्ट खरी. गंगेमध्ये दरवर्षी लाखो लोक स्नान करून जातात. पण त्यांच्यापैकी एखादाच निष्पाप होतो. बाकी सगळे गंगेत स्नान करायचे म्हणून करतात!

"नाथ, मला तर यात काहीच समजले नाही."

"देवी, आपण प्रत्यक्ष अनुभव घेऊन बघू. असे म्हणून भगवान शंकरांनी पुरुष वेश धारण केला आणि देवी पार्वतीने साधा स्त्री वेश केला. ज्या वाटे–वरून यात्रेकरू परत जातात, त्या बाजूच्या एका तलावात तुम्ही उतरा आणि "मी बुडते आहे, मला कोणी वाचवा हो!" असे जोराने कळवळून ओरडा. स्नान करून परत जाणारे यात्रेकरू तुम्हांला वाचवायला येतील, त्यांना सांगा "भाऊ, दादा" तुम्ही मला वाचवायला आला आहात पण एक लक्षात ठेवा मी पतिव्रता स्त्री आहे, जो पापी पुरुष मला हात लावेल तो स्वतः जळून

भस्म होईल, म्हणून पूर्ण निष्पाप जो असेल त्यांनीच मला वाचवण्याचा प्रयत्न करावा, नाहीतर मला वाचवतांना स्वतःचा प्राण गमावून बसाल. असे सांगून भगवान शंकर तलावाच्या काठावरील निंबवृक्षाचे छाये खाली आसन घालून बसले व इकडे देवी पार्वती तलावात उतरून सांगितल्याप्रमाणे ओरडू लागल्या.

एका अबलेचा ओरडा ऐकून स्नान करून परत जाणारे यात्रेकरू तेथे जमा झाले व तलावात उतरू लागले. तेवढ्यात देवी पार्वतीने सांगितले "भाऊ दादा" तुम्ही मला वाचवण्यास आला आहात त्याबद्दल मी आभारी आहे. परंतु एक गोष्ट लक्षात ठेवा मी पतिव्रता स्त्री आहे, जो पापी पुरुष मला स्पर्श करेल तर तो जळून भस्म होईल. तरी जो पूर्ण निष्पाप असेल, पवित्र असेल त्यानेच मला हात धरून बाहेर काढावे.

देवी पार्वतीने असे सांगितल्यावर जो तो आपसात कुजबूजू लागला. "अरे ही बाई तर बुडून मरणार" असा कोण पवित्र व निष्पाप आहे!

जाणूनबुजून काहीतरी पाप हातून झालेच असेल. अशा आपसात बोलत सर्वजण निघून गेले देवी पार्वती इकडे ओरडतच होत्या. त्या रस्त्याने हजारो यात्रेकरू स्नान करून जात होते, पहात होते, पण देवी पार्वतीची अट ऐकन तेथे कोणी न थांबता निघून जात. थोड्यावेळा पूर्वी जमलेले सर्व लोक आपसात बोलत निघून गेले.

निंबवृक्षा खाली बसलेले शंकर भगवान ह्यांनी अर्थपूर्ण नजरेने देवी पार्वतीकडे बघितले "बघा कोणाला तरी असे वाटले कां आपण निष्पाप झालो म्हणून! सर्वांनी स्नान तर केले पण कोणालाही खात्री वाटत नाही." गंगेत स्नान केल्याने जन्मोजन्मीची पापे धुतली जातात ही वस्तुस्थिती आहे, परंतु त्याबद्दल विश्वास कोणाला वाटत नाहीं!

"नाथ, एवढ्या लोकांमध्ये एकालाही विश्वास नसावा, आश्चर्यच आहे!"

"देवी, असं काय म्हणता" बहुरत्ना वसुंधरा थोडावेळ वाट बघा एखादा निघेलही विश्वास असणारा!

थोड्या वेळाने एक जवान स्नान करून येत होता. तोंडावर त्याच्या अपूर्व तेज दिसत होते. नुकतेच स्नान केले असल्याने त्याच्या केसा मधून पाणी

निथळत होते. तो "साईराम! साईराम" असा जप करत चालला होता. त्याला देवी पार्वतीची हाक ऐकू आली तसा तो त्या तलावात शिरला. देवी पार्वतीने सांगितले मी पतिव्रता स्त्री आहे. पापी पुरुषाचा मला स्पर्श होता कामा नये. त्यामुळे तो स्वतः जळून भस्म होईल.

"आई, मातोश्री", तुम्ही काहीं चिंता करू नका. मी पूर्ण निष्पाप आहे, कारण मी आताच गंगेत स्नान करून आलो आहे. गंगेत स्नान केल्याने आपली सर्व पापे जळून भस्म होतात, असे शास्त्र वचन आहे असे म्हणून त्याने देवी पार्वतीला हात धरून बाहेर काढले.

भगवान शंकरांनी त्याला दर्शन दिले, आणि देवी पार्वतीला म्हणाले लाखामध्ये हा असा एकच निघाला की, त्याला आपल्या शास्त्रवचनांवर विश्वास आहे, श्रद्धा आहे, म्हणून हाच खरा वैकुंठ किंवा कैलासाचा अधिकारी बाकी सर्व "यमलोकाची" भरती.

आपण सर्वांनी आपल्या शास्त्र वचनावर व श्रीसाईबाबांनी सांगितलेल्या श्रद्धा सबुरीवर विश्वास ठेवावा. त्यामुळे आपल्याला त्याचे पुरेपुर फळ मिळेल. व सर्व संकटातून तो श्रीसाई परमेश्वर पार करेल. श्रीसाईचरित्रात त्याबद्दल "हेमाडपंतांनी" सांगितलेच आहे

*अध्याय २५ १०५ ते १०८] ओव्या

झालो जरी गतप्राण । वाक्य माझे माना प्रमाण । माझी हाडे तुर्बतीमधून देतील आश्वासन तुम्हांस ॥ मी काय पण माझी तुर्बत । राहिल तुम्हांसवे बोलत । जो तीस अनन्य शरणांगत । राहील डोलत तयासवे ॥ डोळ्या आड होईन ही चिंता । करू नका तुम्ही मज करता। माझी हाडे ऐकाल बोलता। हितगुज करता तुम्हांसवे ॥ मात्र माझें करा स्मरण । विश्वास युक्त अंतःकरण ठेवा करा निष्काम भजन । कृत कल्याण पावाल ॥ अध्याय १७ ओवी ८३ व ११३ माऊली ती सकळांची । विश्रांति आर्त श्रातांची । कल्पवल्वी आश्रितांची दिना दुबळ्यांची जी छाया ॥ फिकीर न करावी यत्किंचित । सदा असावे आनंद भरित । चिंता न करावी आमरणान्त । उपदेश नित्य बाबांचा ॥

मात्र भक्तांनी हे पण लक्षात ठेवावे

अध्याय १५ ओवी ६७-६८ तुम्ही कोण कुठेही असा । भावे मज पुढे पसरिता पसा ।। मी तुमचिया भावासरिसा । रात्रंदिन उभाच ।। माझा देह जरी ईकडे । तुम्ही साता समुद्रापलिकडे । तुम्ही काहींहि करा तिकडे । जाणिव मज तात्काळ अध्याय १४ ओवी ९५ करी जो मज जीवप्राण । ऐसी याचीच मज वाण । तो देता मज एकगण । देतो मी शतगुण तयांसी ।। अध्याय ४३।१४५ मनोभावे पुजा करिता । भक्तिभावे तया आठविता । अनुभव येईल सकळ भक्ता । सर्व व्यापकता दिसेल ।। अध्याय ४४।११४ बाबा न आज देहधारी । तरी तो तयांचे स्मरण करी । तयांते अजूनही हितकारी । पूर्वील परी सदेहसे ।।

म्हणून भक्तांनो श्रद्धा सबुरीवर पूर्ण विश्वास ठेवा मनात विकल्प आणू नका, मग तो परमेश्वर श्रीसाई तुमच्या पाठीशी उभा आहेच.

☆

# रामनवमीला चला शिरडीला

रामनवमीला । चला शिर्डीला ।।धृ.।।

आनंदे लुटाया । पाहूनी साईला ।
भक्तजनांचा मेळा । असे भोवताली
त्यांच्या संगे राहू । साईच्या देऊळी ।।१।।

अक्कलकोट साईनाथ । नामे ही गर्जून
शिर्डीचा पार । गेला हो भरुन ।।२।।

शिर्डी क्षेत्र आमुची । झाली भक्तीची
किती किर्ती गावी । साईनाथाची ।।३।।

प्रेम भावे गाऊ । साईची गाथा
भक्ति भावे ठेवू । साईचरणी माथा ।।४।।

—रखमाताई डोंगरे
१९६ पाषाणगाव पुणे ८

# लावा कावड रांगा

(नऊ मैलांवरील श्रीगोदेवरून भल्या पहाटे कावडी आणून श्रीबाबांना त्यांच्या रामनवमी उत्सव प्रसंगी मंगलस्नान घालण्याची प्रथा आज अनेक वर्षे श्रीशिरडीस चालत आलेली आहे.)

झपझप झपझप उचला पाऊल
धरा समाधि–मार्गा
श्रीसाईंच्या मंगलस्नाना
लावा कावड–रांगा ॥धृ.॥
खळखळ शुभ्र बिलोरी
वाहे गोदा–गंगा
करा स्नान, घ्या भरा कावडी
घेई प्राची–रंगा ॥१॥

निर्मळ देहीं निर्मळ कावड
निर्मळ ही भय–भंगा
आतुर अंतर, ही तर कन्या
भेटी ये गौरांगा ॥२॥

सहस्त्र हस्तें सहस्त्र धारा
मनें पोचली स्वर्गा
सार्थक जन्मा, क्षण हा एकच
सदेह मुक्ति भोगा! ॥३॥

—प्रा. र. श्री. पुजारी
रमानिवास ९९२ सदाशिव पेठ,
पुणे ३०

# चरणी लीन व्हावे

घडो मज साई क्षणिक (क्षण एक) साकार दर्शन ॥

निरंतरी आस सदा उरे
पडो माझा देह धरणीं साईनाम घेता
होईल मांगल्य जीवनाचे

जडो ही बाधा, साई ह्या आत्म्यासी
दुजे मागणे आतां न उरले कांहीं

भजन अर्चन नको कांहीं देवा
शांति समाधी हीच तुझी सेवा

शब्द नको, क्रिया नको एकरूप मी होईन
आराधना तव चरणी हीच रात्रंदिन

जन्माचे हे फेरे कसे चुकवावे
एकची ठावे मजसी चरणी लीन व्हावे ॥

—डॉ. ग. स. कामत
११९४/१३ प्रसाद बंगला
शिवाजी नगर पुणे ५

# प्रार्थना

साई, तव चरणी मी दास ।।धृ.।।
माय तात जन्मास घालती
परि आयुष्या ते नच पुरती
आता भरवसा तुमच्यावरती
घडो सतत सहवास ।।१।। साई

जे मागितले ते ते दिधले
मागण्याचे काहीं न उरले
तवकृपेने सर्वहि घडले
न उरे अट्टाहास ।।२।। साई.

पूर्वसुकृते आलो जवळी
नियतीची ही रीत आगळी
मार्ग दर्शने तुम्च्या घडावा
माझा पुढील प्रवास ।।३।। साई,

आता न उरले माझे मी पण
साई समर्था सर्व समर्पण
साईनामासहित चालू दे
माझा श्वासोच्छ्वास ।।४।। साई

अतिव शुभंकर मम प्रारब्ध
सदा राहणे तुमच्या सन्निध
होण्या मी तादात्म्य स्वरूपी
घडो सतत अभ्यास ।।५।। साई

तुमची साधी शिकवण सात्विक
श्रद्धा' सबुरीची उपकारक
परमार्थी संसारी तारक
एकचि मनि विश्वास ।।६।। साई

पडता तव दृष्टी हितकारक
आयुष्याचे होई सार्थक
आता दुरावा कधि न घडावा
ऐसा एकचि ध्यास ।।७।। साई

-डॉ. एस. जी. दिक्षित
एम. ए. एम. कॉम. पी. एच. डी,
१२०६ शिरोळे रोड, शिवाजीनगर पुणे ४

# साईबाबांचं दरसन घ्यायला

(एक ग्रामीण महिला श्रीबाबांची परमभक्त आहे. श्री साईबाबांच्या वास्तव्याने पावन झालेल्या शिरडी गावाला चलण्याचा आग्रह ती आपल्या सर्वांना करते आहे. श्रीसाईबाबा यांना कृष्णस्वरूपात पाहणारी ही महिला म्हणते आहे.)

साईबाबांचं दरसन घ्यायला
चला ग चला शिरडी गावाला

शिरडी भूमीचं झालं सोनं
भक्ति बियाणं तिथं रूजवून
मळा भक्तिचा डोले जोमान
दंग भजनात भक्तगण
साईबाबा दावी ग लीला ।।१।।

गुलाल फेकितो हा गिरीधारी
पंचिम रंगाची करी साजरी
कृष्णरूप दावितो ग बाई
जिवाशिवाची भेट ग होई
साईबाबा खेळे दहिकाला ।।२।।

पाहिला जागेपणी सारंगपाणी
लीन झाले मी आपसुक चरणी
बाबा भक्तास द्या आसरा
आसावरी आली दरबारा
साईबाबांचा जयजय बोला ।।३।।

—लावणी सम्राज्ञी सौ. आसावरी वायकूळ
इ-९/८ बर्वेनगर, घाटकोपर मुं. ८४

# कृपावंत साई

कृपावंत तू! मजला काहीं कमी नाहीं
कृपावंत तू। मजला काहीं कमी नाहीं
तुझे नाम ओठी येवो नित्य प्रभो साई ॥धृ.॥

सुखासीन जीवन जगती
तुझ्याच या जगले
अंध पंगु जीवा बघुनि
हृदय विद्ध होते.
तुझ्याविण वाटति मज या शून्य दिशा दाही ॥१॥

पूर्वसुकृते लाभला, जन्म मानवाचा
कसे करू सार्थक त्याचे? मार्ग दावि साचा
अंधःकारी अज्ञानाच्या ज्ञानदीप होई ॥२॥

भाग्य कुठे माझे देवा?
तुला भेटण्याचे
क्षणोक्षणि संसाराच्या
रंगी मन नाचे
इवलीशी जागा मज तु तुझ्या हृदयी देई ॥३॥

—सौ. मालती य. आगाशे
स्युएज प्युरिफिकेशन स्टाफ क्वार्टर्स
सेनापती बापटमार्ग, दादर, मुम्बई २८

# मुक्तीचा आनंद

दु:ख नेते प्रभुपदाशी
सुख नेई विलया
म्हणूनी मागे संत तुका
दु:ख द्या हो विठ्ठला
दु:खाचे हे येती कढ
हृदयाच्या गाभ्यातूनी
आर्त हाक ऐकू येता
जागा होई श्रीहरी!
हरी म्हणजेच अन्तरात्मा
अन्तरीचा साईनाथ!
हेलावतो या कंपनानी
कृपेचा हा सागर!
जीवन लागे मग झुलाया
भक्तिच्या लाटांवर
मिळो न काहीं तरी ही लाभे
अपार शांती सुंदर!
भक्तिची ही साथ सोडी
मुक्तीच्या मार्गावर
जीवन–मुक्ति–दिव्यानंदा
न राहे पारावर!
होताच हा साक्षात्कार
लोप पावे अहंकार
तो' मी' तो' मग नाही निराळे
सर्वच असती ईश्वर!

—श्री. र. शं. जून्नरकर
५ वसंत अपार्टमेंटस कस्तूर पार्क,
बोरीवली मुम्बई ९२

# हरे क्लेश सर्व साई

एक मूर्ती थोर कीर्ती
देई स्फूर्ती नित्य साई
थोर संत दिसे शांत
फेडी भ्रांत नाथ साई ॥१॥

शिर्डी ग्राम पुण्य धाम
नित्य नाम गर्जे साई
मनोभावे गीत गावे
मुखी घ्यावे नाम साई ॥२॥

घेता नाम होई काम
भेटे राम रूपे साई
कृपा थोर सर्वांवर
श्रद्धेवर धावे साई ॥३॥

भक्त येती सुखे जाती
नित्य प्रीति ठेवी साई
वाजे घोष येई जोश
हरे क्लेश सर्व साई ॥४॥

—श्री. प्र. अ. पुराणिक,
देशमुख वाडा धुळे

# साईनाथाय नमः

श्रीगणेशाय नमः । श्री गुरवे नमः ।
ओम् शिवाय नमः । साईनाथ साईनाथ ॥१॥

अन्यायाचा नाथ । संकटावरी करी मात ।
सर्व जगी फिरत । साईनाथ साईनाथ ॥२॥

दीनांची साऊली । अन्यायाची माऊली ।
अज्ञानाची गाऊली । साईनाथ साईनाथ ॥३॥

विश्वरूपी अवतार । वेदांचे घर ।
तेजोमय हार । साईनाथ साईनाथ ॥४॥

सर्व देवतांचे रूप । सर्वांचा असा एक मायबाप ।
हरण करतो पापताप । साईनाथ साईनाथ ॥५॥

देवांचा देव । तो असे महादेव ।
तोच हा अवतार एकमेव । साईनाथ साईनाथ ॥६॥

जगाचा पालक । वैकुंठपती जग चालक ।
त्यांचेही रूप एक । साईनाथ साईनाथ ॥७॥

संकटकाळी घेता नांव । साईबाबा असे नांव ।
शिरडी असे गांव । साईनाथ साईनाथ ॥८॥

सदा मुखी साईनाथ । तो असे साथ ।
सबका मालिक एकसाथ । साईनाथ साईनाथ ॥९॥

॥ सद्गुरु साईनाथ महाराज की जय ॥

–श्री. सितांराम नारायण पवार
१३/२ प्रतिक्षानगर, वाकोलाब्रिज
सांताक्रझ मुम्बई ५५

# साई महिमा

शिर्डीक्षेत्री आनंदाने दर्शन घेवू दे रे ॥
तुझे रूप पहाण्यासाठी मला येऊ दे रे ॥धृ.॥
चहुंकडूनि मिळुनि आल्या, एकरूप वाटा
भूसागरी उसळुनि दाटल्या, त्या भाविक लाटा
त्या उदंड सोहळ्यामधी, मला मिसळू दे रे ऽऽ
तुझे रूप पहाण्या ॥१॥

एक एक भक्तांची ती रांग सरकताना
आणि अभिषेकासाठी मला जागताना
त्या सुंदर पहाटेसाठी मला स्फूर्ति दे रे ऽऽ
तुझे रूप पहाण्या ॥२॥

आवो साई' म्हणूनि त्यांना म्हाळसा हाकारी
आणि पुढे तेचि नाम त्रिभुवनी पुकारी
आता तोचि साईमहिमा गाऊ दे रे ऽऽ
तुझे रूप पाहण्या ॥३॥

संत संत म्हणूनि त्यांसि थोरवी मिळाली
आणि जगी त्यांची महति भक्तासी कळाली
त्या उत्सुक मीलनासाठी स्वैर धावू दे रे
तुझे रूप पहाण्या ॥४॥

शिर्डीक्षेत्री आनंदाने दर्शन घेवू दे रे ॥
तुझे रूप पहाण्यासाठी मला येवू दे रे ऽ ऽ ऽ

—श्री. संजय केशव परळकर
नाना निवास गोखले रोड, दादर, मुम्बई २८

# साईनाथ

रंजल्या गांजल्या जीवांचा आधार
शिरडीचा नाथ, साईनाथ

अंधारात शोधी, आंधळा उजेड
प्रकाशाचा वेल, साईनाथ

दुःखात ठेचाळे, लंगडा पांगळा
काठीचा आधार, साईनाथ

उन्हात तापतो, संसार तापाने
सुखाचा गारवा, साईनाथ

व्याकुळ मनाला, निराशा ग्रासते

आशेचा किरण, साईनाथ ...

—श्री. म. कृ. विचारे
१५ बी. भक्तिसुधा, वाकोला
सांताक्रूझ मुम्बई ५५

---

# तुझ्या दारी आले साई

तुझ्या दारी आले साई भेटण्या अधीर
पद्मयुग्म दाखविशी कां होऊनि उदार ॥धृ.॥

तुझ्या दर्शनाची मजला हौस होती फार
तुझ्या नाम संकीर्तनी जाहले गंभीर
तूच मला आशीष द्यावा आणि मना धीर
तुझ्या नाम वैभवाची कीर्ती फार दूर ॥१॥

—सौ. शोभना सानबलकर
३२० इंद्रपुरी, इंदूर (मध्यप्रदेश)

# साईनाथाष्टक

बहु कीर्ति प्रख्यात ज्याची जगांत ।
वस्ती जयाची नित्य शिर्डी ग्रामांत ।
सर्वदा नामघोष चाले जनांत ।
नमस्कार माझा तया साईनाथ ॥१॥

बहुत असे सत्व नामी जयाच्या ।
स्वमुखे उच्चारता नामा तयाच्या ।
नष्ट होती पापराशी जीवनाच्या ।
नमस्कार माझा तया साईनाथा ॥२॥

गळा रूळती पुष्पमाला जयाच्या ।
करीतसे पूर्ण कामना मनीच्या ।
ओळखीतसे भावना अंतरीच्या ।
नमस्कार माझा तया साईनाथा ॥३॥

प्रभातीस नित्य अभिषेक होती ।
शुचिर्भूत होऊनी भाविक येती ।
बहु आदरे ते मूर्तिसी वंदिती ।
नमस्कार माझा तया साईनाथा ॥४॥

असे प्रीति जयाला गुरुवाराची ।
पालखी नित्य निघतसे तयाची ।
जमतसे गर्दी भाविक जनांची ।
नमस्कार माझा तया साईनाथा ॥५॥

नाहीं जातीभेद जयाच्या ठिकाणी ।
परदेशी येती जयाच्या ठिकाणी ।
चालीतसे दवाखाने त्या ठिकाणी ।
नमस्कार माझा तया साईनाथा ॥६॥

जिथे गर्दी होते भाविकांची अती ।
घडे दानपूजा यथासांग रिती ।
प्रेमादराने भाविक प्रसाद घेती ।
नमस्कार माझा तया साईनाथा ॥७॥

तुला अर्पितो अष्टके साईनाथा ।
दिली स्फूर्ति लिहिण्यास तूच नाथा ।
असाच प्रेम हस्तक राहू दे माथा ।
नमस्कार माझा तुला साईनाथा ॥८॥

—श्री. मधुकर पाठक
दिलीप ठक्कर चाळ,
गणेश कृपा गल्ली, आग्रारोड कल्याण,

## साईलीला

( चाल—सुनचंपा सुनतारा )

साईबाबा – शिरडीवाला – अगाध तो दावी लीला ।
अनुभूती भाविकाला – विदित असे सकळाला ॥धृ.॥

दळणाचे निमित्त करूनी ।
रोग भोग टाकी भरडूनी ॥
भक्त हृदय – जाणूनिया – ईच्छेत प्राप्ती सेवकाला ॥१॥

तेला विणा दिप लावी ।
भक्तिचे तेज प्रगटवी ॥
अज्ञानाचा अंधःकार – नष्ट कराया सारी लीला ॥२॥

साईहृदयी – पांडूरंग ।
वास गणू – पाही बाबासंग ॥
चमत्कृती – वर्णु किती – पंढरी सांगे, साईलीला ॥३॥

—श्री. पंढरीदास खर्डेकर
मु. पो. लोही, ता. दारव्हा, जि. यवतमाळ

# शिरडी वृत्त माहे जानेवारी १९८३

या महिन्यात श्रींच्या दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी बरीच होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे –

कीर्तन – १) ह. भ. प. लक्ष्मण अनंता मिरजकर
२) ह. भ. प. उत्तम रामचंद्र जोशी, बेळगाव (नकुलेश्वर)
३) ह. भ. प. श्री. गहिनीनाथ शिवराम घुले, शेकटे
४) ह. भ. प. श्री. रामचंद्र विष्णू गाडगीळ, विलेपार्ले
५) ह. भ. प. सौ. कलावतीबाई वसंतराव चव्हाण, दादर

प्रवचन – १) ह. भ. प. नारायण काशीनाथ कुलकर्णी, पंढरपूर, २) ह. भ. प. श्री. देशमुख पा. महाराज शिर्डी, ३) ह. भ भ. प 'श्री' नानासाहेब रासने, शिर्डी. ४) ह. भ. प. सुभाष बाबा, अकोला ५) ह. भ. प. निवृत्ती हणमंतराव पाटील, गोंदकर, शिर्डी ६) ह. भ. प. लक्ष्मण महाराज वाघचौरे, शिर्डी ७) श्री उल्हास वामन साळसकर, मुंबई

भजन, गायन, वादन वगैरे :– १) श्री. भोलानाथ रामनाथ समेळ, गिरगांव, २) श्री. हेमचंद्र दत्तोबा तावडे, मुंबई, ३) श्री चव्हाण, मुंबई, ४) श्री. नरेंद्र भास्कर कणेकर, मुंबई, ५) शाहीर गहिनीनाथ पांडूरंग जाधव उर्फ मालेवाडी, जि. सांगली, व पार्टी कलाकार पुढीलप्रमाणे ६) श्री प्रभाकर त्र्यंबक डोंगरे, मॅनेजर, ७) श्री. काशीनाथ पा. स्वार, कोल्हापूर, ८) श्री. संग्राम पा. स्वार, कोल्हापूर ९) श्री हनुमंत संपत कांबळे, तासगाव १०) श्री. महादेव रा. वामणे, चोरांडे, ११) श्री. अर्जुन सखाराम माने, मालेवाडी १२) श्री. आनंदराव आ. जाधव, ३२ शिराळा, १३) श्री उल्हास वामन सोळसकर, मुंबई, १४) सौ. नटेश्वरी गुप्ता, हैद्राबाद, १५) श्री. प्रेमनाथ गुप्ता, हैद्राबाद, १६) श्री लाऊ गोपाळभाई, सांताक्रूझ बँडपथक, १७) श्री. एकनाथ मिराशी व सुपरस्टार वाद्यवृंदाचे पुढील कलाकार लालबाग, १७) श्री. सुर्यकांत तिळवे, १९) श्री. मनोहर वाळवे, २०) तानाजी हडसे, २१) श्री. अविनाश पेडणेकर, २२) श्री. चंद्रकांत तिळवे, २३) श्री. प्रदीप सावजी २४) श्री समर्थ आयरे, २५) श्री. सिद्धार्थ पांचाळ, २६) श्री. अरुण शिर्के, २७) श्री. नारायण कुसे, २८) श्री दिपक घोष, २९) श्री. चंद्रकांत मेस्त्री, ३०) विजया ओटावडकर, ३१) श्री. सुधीर शिरवडकर, २२) श्री. अरुण

राणे, ३३) श्री. शरद पांचाळ, ३४) श्री. एकनाथ पारकर, ३५) श्री. शिरीष नेवरेकर, ३६) श्री. हरीष नेवरेकर, ३७) श्री. सिताराम आंबेरकर ३८) श्री. कृष्णा आयरे, ३९) श्री. प्रकाश मेस्त्री, ४०) श्री. विजय भिरावी ४१) श्री. रमेश पालव, ४२) श्री. विनय सावंत, ४३) श्री. यशवंत शिवराम पितळे, ४४) श्री. माधव जगन्नाथ साखरकर, फणसवाडी, ४९) श्री. धनंजय नारायण म्हात्रे, भाईंदर, ४६) एम. एन. पद्मा राव, सिकंदराबाद, ४७) मायादेवी महिला मंडळ, कल्याण, ४८) श्री. नरेंद्र टोंगळे, अमरावती ४९) श्री साईनाथ भजन मंडळ, परळ, ५०) श्री. बाळ चावरे, दादर, ५१) श्री. बाबा होनप, सोलापूर, ५२) कु. विद्युलता टोम्पे, सोलापूर, ५३) शाहीर पवार आणि पार्टी, निवृत्ती बाबूराव पवार, मुंबई ८, ५४) श्री. साईनाथ म्युझीकल स्टार्स, अरविंद गंगाराम गुरव, ताडदेव, ५५) श्री. रामभक्त मंडळ, हैद्राबाद, साईलीला लेखक कवी संमेलनाचे कलाकार ५६) श्री. श्रीराम विष्णु सातर्डेकर, परेल, ५७) डॉ. एम. के. कीर्तीकर, दादर, ५८) श्री. ग. रा. पालकर, कुर्ला ५९) श्री. मधुकर सी. मंडलीक, नवापूर, ६०) श्री. राधाकृष्ण गुप्ता, डोंबीवली, ६१) श्री. अनिलकुमार लुतडे, वर्धा, ६२) श्री. नागेश मोगलाईकर, धुळे, ६३) श्री. रमेश डी. चव्हाण, नवापूर, ६४) कु. मनोज रमेश चव्हाण, नवापूर, ६५) कु. विपीन रमेश चव्हाण, ६६) रामदास झिपरू चव्हाण, नवापूर, ६७) श्री. रघुनाथ सांडभोर, पूणे, ६८) श्री. प्रकाश करपे' इंदूर, ६९) श्री. वसंत वामन चव्हाण, मुलूंड, ७०) डॉ. विजयकुमार हैद्राबाद, ७१) श्री. शांतीलाल सी. दवे, नवापूर, ७२) सौ. विनोदिनी राजपूत, अंधेरी, ७३) श्री. हसमुख ओंकार पाटील, नवापूर, ७४) श्री. डी. बी. जगतपुरीया, शिरूड, ७५) प्रशांत हसमुख पाटील, नवापूर, ७६) श्री. जगदीश देवपूरकर, धुळे, ७७) श्री. चंद्रकांत नाचणे, विलेपार्ले, ७८) श्री. राहूल खानविलकर, लोणावळा, ७९) हजारे आई, मालेगाव ८०) कु. दिपक रेंवणकर, अंबरनाथ, ८१) बापूसाहेब निरखे, इंदौर, ८२) स्वामी संजयानंद बद्रीनाथ, ८३) सौ. कमल सांडभोर, पुणे, ८४) गुंडुराव पटवारी, बिदर, ८५) सौ. कुमुद टिळक, ८६) सौ. लिलाताई मराठे, ८७) श्री. डी. बी. पोतनीस, ८८) सौ. शशीकला रेवणकर, अंबरनाथ, ८९) कर्नल निंबाळकर, ९०) सौ. शांता सरोदे, मुंबई, ९१) सौ. सुमती खानविलकर, लोणावळा, ९२) इंदु नाईक, लोणावळा, ९३) ग. बा. करंबेळकर, चेंबूर, ९४) सौ. अस्मिता दांडेकर, ९५) सिंधू कृष्णराव सणस, काटोल, ९६) श्री. मोरे, पुणे, ९७) रा. कृ. मोघे, चेंबूर, ९८) दीपा प्रभाकर कोळमकर, बोरीवली,

९९) मनीषा प्र. कोळमकर, बोरीवली, १००) यामिनी प्र. कोळमकर १०१) प्रभाकर गोविंद कोळमकर, १०२) रणजित लक्ष्मण पाटील, १०३) बेबीधरा बिपीन स्वादिया १०४) सौ. स्नेहलता बिपीन स्वादिया १०५) विजय द. हजारे, १०६) सौ. ताराबाई सदानंद चेंदवणकर, मुंबई, १०७) जुगलकिशोर पुरी, चंदीगढ, १०८) आशुतोष जैन, चंदीगढ, १०९) ब्रजमोहन मौर्य, सिगहिखिरी, उ. प्रदेश, ११०) श्री. दत्तात्रय महादेव मोरे, १११) श्रीमती लिलावती गुजराथी, शिर्डी, ११२) सरोजिनी बाई, ११३) श्रीनिधि चंदीगड.

प्रजासत्ताक दिन :– दिनांक २६ जानेवारी १९८३ रोजी सकाळी ७–३० वाजता मा. रिसीव्हर श्री. क. हि. काकरे साहेब यांचे शुभहस्ते ध्वजवंदन कार्यक्रम झाला. संस्थान कर्मचारी सेवेकरी, गावातील प्रतिष्ठित नागरिक, भक्त, साईनाथ माध्यमिक विद्यालयातील शिक्षकवर्ग विद्यार्थी विद्यार्थीनी बँड–पथक, होमगार्ड पोलीस उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहाने साजरा झाला. उपस्थितांना चहापान दिल्यानंतर कार्यक्रम समाप्त झाला.

हवापाणी :– शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काहीं नाहीं. पहाटे हवा थंड असते.

# साईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

| अ.क्र. | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | श्री साईचरित्र | मराठी | २२=०० | ६=०० |
| २) | ,, | इंग्रजी | १३=५० | ४=०० |
| ३) | ,, | हिंदी | १२=०० | ४=०० |
| ४) | ,, | गुजराथी | १२=०० | ४=०० |
| ५) | ,, | कन्नड | १०=०० | ४=०० |
| ६) | ,, | तेलगू | १३=०० | ४=०० |
| ७) | ,, | तामीळ | १२=०० | ४=६० |
| ८) | श्री साईलीलामृत | मराठी | ७=५० | ३=०० |
| ९) | ,, | हिंदी | ७=०० | ३=५० |
| १०) | ,, | गुजराथी | ४=२५ | ३=०० |
| ११) | अवतार व कार्य | मराठी | ४=०० | ३=०० |
| १२) | स्तवन मंजरी | मराठी | ०=३५ | ३=०० |
| १३) | ,, | गुजराथी | ०=३० | ३=०० |
| १४) | सगुणोपासना | मराठी | ०=५० | ३=०० |
| १५) | ,, | गुजराथी | ०=५० | ३=०० |
| १६) | तेलगू पुजाविधी | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| १७) | चार अध्याय | मराठी | १=२५ | ३=०० |
| १८) | श्रीसाईबाबा ऑफ शिरडी (भरूचा) | इंग्रजी | ५=०० | ३=०० |
| १९) | किर्तनमाला | मराठी | ०=७५ | ३=०० |
| १०) | सचित्र साईबाबा | मराठी | ४=०० | ३=०० |
| ११) | शिरडी दर्शन | इंग्रजी | ४=५० | ३=०० |
| १२) | मुलांचे साईबाबा | मराठी | १=७५ | ३=०० |
| १३) | ,, | इंग्रजी | १=७५ | ३=०० |
| १४) | ,, | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| १५) | ,, | गुजराथी | १=५० | ३=०० |
| १६) | ,, | हिंदी | १=७५ | ३=०० |

Regd. No. MH/BYE/26
LICENCE No. 19
Licence To Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14

( कव्हर पृष्ठ ३ वरून )

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७) | दि बेट श्री साईबाबा | मराठी | ०=५० | ३=०० |
| १८) | श्री साईबाबा दि सुपरमॅन | इंग्रजी | ५=२५ | ३=०० |
| १९) | शिरडी गाईड | इंग्रजी | १=५० | ३=०० |
| २०) | ,, | मराठी | १=५ | ३=०० |
| २१) | शिरडी गाईड | गुजराथी | १=५० | ३=०० |
| २२) | ,, | हिंदी | छपाई चालू | आहे. |
| २३) | [illegible] | मराठी | ०=९० | ३=०० |

२४) श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र मराठी व इंग्रजी वार्षिक वर्गणी
१०=०० प्रत्येकी प्रत १=००
( व्ही. पी. ची पद्धत नाही )

| अ. क्र. | फोटोचे नाव | फोटो साइज | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | आशिर्वाद फोटो | १४"×२०' | १=६५ | ३=०० |
| २) | ,, | १०"×१४ | १=१० | ३=०० |
| ३) | ,, | ७"×१०' | ०=५५ | ३=०० |
| ४) | ,, | ४"×६" | ०=२० | ३=०० |
| ५) | ,, | २"×३" | ०=१५ | ३=०० |
| ६) | दगडावर बसलेले बाबा ( रंगीत ) | १४"×२०" | १=६५ | ३=०० |
| ७) | ,, ( काळा पांढरा) | १४"×२०" | १=६५ | ३=०० |
| ८) | मूर्ती फोटो | १३"×१८" | २=७५ | ३=०० |
| ९) | ,, | १३"×१८" | १=०० | ३=०० |
| १०) | द्वारकामाई कॅमेरा ( रंगीत फोटो ) | १०"×२० | १=१० | ३=०० |
| ११) | ,, ( काळा पांढरा) | १०'×१४" | ०=८५ | ३=०० |
| १२) | कॅमेरा द्वारकामाई फोटो ,, | ९'×१२' | १=१० | ३=०० |
| १३) | ,, ( रंगीत ) | ९"×१२' | १=६५ | ३=०० |
| १४) | [illegible] | ९×१३ | ०=७५ | ३=०० |
| १५) | श्रीसाईबाबांचे पत्र्याचे कॅलेंडर | — — — | १६=०० | ८=०० |

मुद्रक : पांडुरंग मोरे, बॉम्बे नॅशनल प्रिन्टर्स प्रा. लि., ४२, बी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ३१, संपादक व प्रकाशक : श्री. क. हि. काकरे, साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लाट नं. ८०४ बी. दादर, मुंबई १४